संस्कार कथामाला ५

# ध्येयाचा ध्रुवतारा



डॉ. कृ. पं. देशपांडे

ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय ....
दा. क्र. ३००५
BVBK-0403005

बा. वा.
3004
९०/८/४८

म. ग्रं. सं. ठाणें, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. 3004 दिनांक ९०/८/४८
विभाग बा. वा. क्र. ........

संस्कार कथामाला भाग – ५

# ध्येयाचा ध्रुवतारा

डॉ. कृ. पं. देशपांडे

BVBK-0403005

मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि.
२५१ – क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

☆ ध्येयाचा ध्रुवतारा (संस्कारमाला भाग–५)
DHEYACHA DHRUVATARA (SANSKA-RMALA BHAG–5)

☆ प्रकाशिका :
सौ. मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.,
२५१ – क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

☆ © डॉ. कृ. पं. देशपांडे
'सुरभि' १३५/१२–ब, प्रभा सोसायटी,
भवानी मंदिराजवळ, पौड रस्ता,
कोथरूड, पुणे ४११ ०२९

☆ प्रकाशन दिनांक :
१४ जानेवारी १९९४ (मकर संक्रांत)

☆ प्रकाशन क्रमांक : ६४३
ISBN–81–85773–65–3

☆ मुद्रक :
श्री. प्रमोद बापट
स्मिता प्रिंटर्स,
१०१९ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

☆ अक्षरजुळणी :
टाईपो-आर्टस्
सौ. धनश्री ध. पुरोहित
१४८१, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ०३०

☆ मुखपृष्ठ :
श्री. अनिल उपळेकर

☆ मूल्य : रुपये वीस मात्र

संस्कारक्षम वयात
ज्यांनी मला
सुसंस्कारित केले
त्या माझ्या
सर्व गुरुजनांना...

गुरुने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा

# प्रास्ताविक :

'संस्कार कथामाला' ही पाच पुस्तकांची मालिका रसिक कुमार वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. आज आपल्या अवतीभवती पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, नीतिमूल्यांची घसरण! विविध क्षेत्रांतील समाजधुरीण आज पुन्हा पुन्हा हेच सांगत आहेत. आमच्या पुढचे आदर्श ढासळले आहेत. वर्तमान काळात आदर्शांचा अभाव निर्माण झाला की भूतकाळ शोधावा लागतो. त्या दृष्टीने भारताच्या इतिहासाकडे पाहिले, संस्कृतीकडे दृष्टिक्षेप टाकला की, अनेक गुणांचे उत्तुंग आदर्श डोळ्यांसमोर उभे राहतात. सद्यःस्थितीत त्यांच्याकडून अनेक गुण शिकता येतील. त्या गुणांची जोपासना करणे आज नितांत आवश्यक बनले आहे. त्यातूनच भावी पिढी घडेल आणि देशाला आवश्यक असणारे निष्ठावान, चारित्र्यवान, गुणी नागरिक लाभू शकतील. देशभक्त, समाजसुधारक निर्माण होऊ शकतील असे लोक भावी पिढीतून निर्माण व्हावेत आणि त्यांनी भारताला जगात मानाचे स्थान मिळवून द्यावे यासाठी हा अल्पसा प्रयत्न! मालिकेचा प्रपंचही त्याचसाठी!!

या पुस्तकात सहा कथा घेतलेल्या आहेत. 'सत्त्वपरीक्षा' ही पहिली कथा. अयोध्येचा राजा हरिश्चंद्र याच्या मुलाची- रोहिदासाची ही कथा आहे. येणाऱ्या संकटाला धैर्याने तोंड कसे द्यावे याचे दिग्दर्शन करणारी ही कथा आहे. दुसरी कथा 'भक्तीचा पाहुणा'! यात भक्ताचा महिमा सांगितलेला आहे. शिवाय क्रोध हा विकार विनाशकारक असून त्यावर ताबा ठेवणे कसे आवश्यक आहे याची कल्पना दिली आहे. 'सुभद्राहरण' ही कथा कृष्णाच्या चातुर्याची आहे. 'क्षण एक पुरे..' ही कथा महानुभाव कवी नारायणदास यांच्या पूर्वायुष्यातील असून, सूडाचे समाधान क्षणभंगूर असते. जीवनाचे सार्थक जीव घेण्यात नाही, जीवाला जीवन देण्यात आहे, हे सांगणारी आहे. प्रतापराव गुजर हे शिवकाळातील मराठी सैन्याचे सरनोबत. त्यांच्या पराक्रमाची, आज्ञापालनाची आणि

महाराजांच्या शिस्तीची, आदरयुक्त भीतीची कथा 'सात वेडे वीर' यात सांगितली आहे. अखेरची कथा 'ध्येयाचा ध्रुवतारा' ही कथा, ज्यांनी भारतात पहिला मूकपट बनविला. त्या कै. दादासाहेब फाळक्यांच्या ध्येयपूर्तीची आहे. या पुस्तकाचे अंतरंग हे असे आहे.

ही मालिका देखण्या स्वरूपात प्रकाशित करून, वाचकांसमोर ठेवणारे दिलीपराज प्रकाशनचे श्री. व सौ. बर्वे, श्री. सुहास काळे, मुद्रक, चित्रकार या सर्वांचाच मी ऋणी आहे. आजपर्यंतच्या मालिकांचे आणि ग्रंथांचे वाचकांनी ज्या आत्मीयतेने, प्रेमाने स्वागत केले, तीच आत्मीयता, प्रेम या मालिकेलाही लाभेल असा विश्वास आहे.

**कृ. पं. देशपांडे.**

# क्रमदर्शिका


- सत्त्वपरीक्षा ,
- भक्तीचा पाहुणा /
- सुभद्राहरण /
- क्षण एक पुरे... /
- सात वेडे वीर /
- ध्येयाचा ध्रुवतारा /

३००५ वा.वा.
१०।८।९४

# १. सत्त्वपरीक्षा

'कोण रोहिदास! तुझीच वाट पाहत होतो. आता काळजी करू नकोस. तुझे आईवडील सुखरूप आहेत... संकट संपले आहे.'

मुनिवरांचे स्निग्ध शब्द ऐकून रोहिदास थबकला. आश्चर्याने नि आनंदाने त्याच्या मुखातून शब्द उमटले. तो त्या मुनिवरांकडे पहात असतानाच चार दिवसांपासूनचे प्रसंग त्याच्या डोळ्यांसमोर उभे राहिले.

त्याच्या वडिलांनी-हरिश्चंद्राने-विश्वामित्रांना राज्य दान दिले होते. 'दक्षिणेशिवाय दानाला पूर्णता नाही,' हे विश्वामित्राने सांगताच स्वकष्टाने हजार मोहरा देण्याचे अभिवचन दिले होते. ते वचन पूर्ण करण्यासाठी अयोध्येचा राजा हरिश्चंद्र, राणी तारामती आणि राजकुमार रोहिदास त्यांच्या राज्याच्या सीमेबाहेर, काशीखंडात निघाले होते. रोहिदास वयाने लहान, त्याचीही परीक्षा घ्यावी म्हणून विश्वामित्र खोट्या प्रेमाने त्याला म्हणाले होते.

'रोहिदासा, तू कशाला यांच्या बरोबर जातोस? मी काही तुला राज्याबाहेर जायला सांगितलं नाही. इथे खुशाल रहा. उगाच सुखाचा जीव दु:खात घालू नकोस.'

रोहिदास वयाने लहान होता; पण कुलाभिमानी होता. सिंहाचा छावा होता. आपल्या वडिलांनी राज्य दान केले आहे, हे त्याला माहीत होते. दान केलेल्या राज्यात राहील तो क्षत्रिय कसला? वेळ आली म्हणून पिळाची माणसे मोडतील पण वाकतील कशी? पुन्हा पुन्हा विश्वामित्र सांगत होते,

'रोहिदासा, तू इथंच रहा, आपण होऊन कशाला दु:खात उडी घेतोस, मी तुला त्यांच्याबरोबर जायला सांगितलं नाही. इथं सुखानं रहा.'

रोहिदासाने बाणेदारपणे उत्तर दिलं,

'मुनिवर! माझ्यापुढं सुखाच्या गोष्टी काढून काय उपयोग? जिथे

माझे आईबाबा असतील तिथंच मी जाणार. हे राज्य आपल्याला दान दिलं आहे. दान दिलेल्या राज्यात मिंधेपणानं क्षत्रिय रहात नसतात. सुखाचंच म्हणाल तर सुख मानण्यात असतं, नाही का? राजमहालात चैनीत असतानाही जर मन तळमळत असेल तर सुख कसे मिळेल? उलट, आईबाबांच्या प्रेमळ छत्राखाली वनवासही आनंदाचा होईल. दु:खही सुखाचं रूप घेईल. मुनिवर! विषही अमृत होईल.'

विश्वामित्राला हे शब्द झोंबले. ते म्हणाले, 'ठीक आहे, या वयात हा ताठा! कळेल, परिस्थितीने पोळून निघालास म्हणजे कळेल हा बाणेदारपणा कितपत रहातो ते. मीच पहातो तुझा हा पीळ किती दिवस टिकतो ते! संकटांच्या परंपरा कोसळल्या की प्रसंगी वज्रालाही लवावं लागतं. तू तर कोवळा पोर!'

रोहिदासाने त्यांचे हे आव्हान जणू स्वीकारले होते. मन जर खंबीर असेल तर कोणत्याही संकटाला धैर्यानं तोंड देता येते.

हे माहीत असल्यामुळे संकटांच्या परंघरा कोसळल्या तरी त्याला धैर्याने सामोरे जायचा निश्चय त्याने केला होता, तो आपल्या आईवडिलांच्या बरोबर काशीनगरीचा रस्ता आक्रमू लागला होता.

ग्रीष्माचे दिवस होते. सारी पृथ्वी पोळून निघाली होती. जमिनीला भेगा पडल्या होत्या. सूर्याच्या असह्य तापाने झाडांनीही माना टाकल्या होत्या. नद्या आटून गेल्या होत्या. सगळेच त्रस्त झाले होते. ग्रीष्माचे तांडव नृत्य चालू होते. अशा दिवसांत रोहिदास काशी नगरीला चालला होता. सूर्यवंशाचा हा राजकुमार, सुकुमार, पण त्याच्या वंशजालाही सूर्य हैराण करीत होता. सुखात सगळे सोबत करतात; पण दु:खात मात्र आपण एकटेच असतो. एकाकी! घराबरोबर वासेही फिरतात. मित्रही शत्रू होतात. सूर्याचा तरी काय दोष, जगरहाटीचेच त्यानेही पालन केले होते.

राजवाड्यात मखमली गालिच्यावरून चालायची ज्यांना सवय होती, ते पाय काटे तुडवीत चालले होते. ऊन म्हणजे काय हे ज्याला माहीत नव्हते, ते शरीर उन्हात करपत होते. आई-वडिलांच्या प्रेमळ चुंबनाने लाल होणारे गाल उन्हाच्या तिरिपींने लाल होत होते. मिष्टान्नाशिवाय ज्याने कधी अन्न सेवन केले नव्हते त्याला कंदमुळे आणि फळांचे सेवन करायला लागत होते. तृषा हा शब्द ज्याला माहीत नव्हता

त्याला पाण्यासाठीं वणवण भटकावे लागत होते. गाद्यागिर्द्यांच्यावर झोपणाऱ्या कोमल शरीराला तृणशय्या अंगीकारावी लागली होती. हे सारे तो मोठ्या धैर्याने करीत होता. हे त्याचे धैर्य पाहून तशाहीं अवस्थेत हरिश्चंद्राचे आणि तारामतीचे हृदय प्रेमाने उचंबळून येत होते. आपल्या कुळाचे ब्रीद ज्या पद्धतीने तो सांभाळत होता ते पाहून दोघांनाहीं धन्यता वाटत होती. आणि हे हाल या वयात त्याला सहन करावे लागतात हे पाहून वाईटही वाटत होते. कष्टांची जीवघेणी जाणीव देण्यासाठीं दिवस उगवत होते आणि त्या कष्टांवर आपल्या मायाळू हातांनी रात्री पांघरूण घालीत होत्या.

जाता-जाता तिघेहीं एका जंगलात आले. झाडांनी आणि वेलींनीं रस्ता दुस्तर करून ठेवला होता, वर आकाशापर्यंत भिडलेली झाडे होती. काही झाडांना काटेरी वेलींनी लपेटून घेतले होते. सूर्याची किरणे क्वचितच खाली उतरत होती. उन्हाचा त्रास कमी झाला होता तरी दगड, गोटे आणि काट्याकुट्यांनी पाय रक्तबंबाळ व्हायची वेळ आली होतीं. जाताना वेलींचे, काटेरी झाडाचे काटे अंगावर ओरखडे काढीत होते. अशा स्थितीत सकाळपासून ते तिघेही रस्ता आक्रमत होते. संध्याकाळच्या आत जंगलातून बाहेर पडणे आवश्यक होते. आधल्या दिवसापासून पोटात पाणीहीं गेले नव्हते. पाय मरगळले होते. त्राण उरले नव्हते, तरी पुढची ओढ होतीं. पाय पुढे टाकणे भाग होते.

रोहिदास तहानेने व्याकुळ झाला. पुढे पाऊल पडेना. त्याने वडिलांना विचारले, 'तात, कालपासून पाणी मिळालं नाही. थोडंसं पाणी नाहीं का मिळणार ? '

'बाळ, आज तुला पाणीही देता येत नाही. तू पाहतो आहेस की, या भयाण अरण्यात आपण आलो आहोत. इथं जवळपास कोठेहीं पाणी दिसत नाही. थोडा वेळ थांब, हे अरण्य संपले की कोठून तरी पाणी शोधून काढू. मग पोटभर पाणी पी हं!' रोहिदासाची हरिश्चंद्राने समजूत घातली. पाण्याच्या आशेने रोहिदासाचे पाय वेगाने पुढे पडू लागले.

काहीं काळ शांततेत गेला. एकाएकी वाऱ्याचा झोत आला. वाऱ्याबरोबर कोठून तरीं धुराचा लोट आला. डोळे चुरचुरले. तिघे आणखीं पुढे गेले. धूर वाढत गेला आणि आणखीं काही क्षणांत वाढलेल्या

धुराने काहीच दिसेनासे झाले. हरिश्चंद्राच्या लक्षात एक गोष्ट आली की, जंगलात वणवा लागला आहे. त्याने ओरडून सांगितले, 'बाळ, रोहिदासा, तारामती, जंगलात वणवा लागला आहे. धुराने काहीही दिसत नाही. पळा आपला जीव वाचवा, प्रभूची इच्छा असेल तर आपली गाठ होईल. जा लवकर जा.'

हरिश्चंद्राचे शब्द ऐकून दोघांची स्थिती वेड्यासारखी झाली. क्षणभर कोठे जावे कळेना. जीवाच्या भयाने रोहिदास पळाला. तारामतीही दिसेनाशी झाली. तीन जीव वेगवेगळ्या मार्गाने पळत निघाले. जीव वाचविण्यासाठी! दैवाचा हा आणखी एक तडाखा! आणखी एक कसोटी!

संकटाच्या परंपरा कोसळत होत्या आणि रोहिदास त्यांना सामोरा जात होता. बराच वेळ तो धावत होता. दूर अंतरावरून सूर्याचे तिरपे किरण त्याला दिसले. थोडा पुढे गेल्यावर त्याला कळले जंगल संपले आहे. आपण वणव्याच्या संकटातून सुखरूप बाहेर पडलो आहोत. तहानेने व्याकुळ झालेला, पळण्याने थकलेला आणि भुकेने श्रांत झालेला रोहिदास थोडा वेळ बसला. त्याने थोडी विश्रांती घेतली. पुन्हा पावले रस्ता आक्रमू लागली. आता एकच विचार त्याला सतावीत होता. 'आई बाबांची भेट कशी व्हायची?'

सूर्य मावळतीला झुकला होता. दूर अंतरावर रोहिदासाला एक आश्रम दिसला. मोठ्या आशेने तो तेथे गेला. एक मुनी ध्यानस्थ बसले होते. 'आईबाबांविषयी विचारावे का?' त्याच्या मनात कल्पना चमकली. 'कदाचित त्यांना माहीत असेल, कदाचित हे त्रिकालज्ञ मुनी असतील. काहीतरी मार्ग सांगतील. योगायोग मोठे विचित्र असतात. त्यामुळेच कदाचित आपण या आश्रमाजवळ आलो असू.' दैवगतीचे त्याला कौतुक वाटले. त्याने मुनींना नमस्कार केला. त्या मुनींने डोळे किलकिले करून पाहिले. आणि घनगंभीर आवाजात ते म्हणाले— 'कोण, रोहिदास! तुझीच वाट पहात होतो. आता संकट संपलं आहे.'

'मुनिवर...!' आश्चर्याने त्याच्या तोंडून शब्द फुटेना.

'बाळ, आता घाबरू नकोस. तुझे आईवडील सुखरूप आहेत. माझ्या आश्रमापासून थोड्याच अंतरावर एक रमणीय तलाव आहे. मघाशीच तेही येथे आले होते. त्यांना त्या तलावाकाठी तुझी वाट पहायला मी सांगितले आहे. तेथे जा. त्यांना भेट.'

''मुनिवर! आपलं ऋण कोणत्या शब्दानं व्यक्त करू?'

'रोहिदासा, मी सारं जाणतो. विश्वामित्रांचं हे कारस्थान मला माहीत आहे; पण तरीही आल्या संकटांना धैर्यानं तोंड दे. सोनं मुशीत घातल्याशिवाय उजळत नाही. हिऱ्यालाही पैलू पाडावे लागतात. ही संकटं मानवी जीवनाचं वास्तव दर्शन घडवितात. जीवनाला आकार देतात. पैलू पाडतात. म्हणूनच संकटांना जे धैर्याने सामोरे जातात, त्यांचे जीवन विविधतेने फुलून जाते. त्यांच्या अंगी शक्ती निर्माण होते. ती शक्ती, ते सामर्थ्य प्रभू तुला देईल. माझा आशीर्वाद आहे.'

रोहिदासाच्या पाठीवरून त्या मुनींनी हात फिरविला. त्या स्पर्शात चंद्रकिरणांची शीतलता होती. अमृताची माधुरी होती. आईचे वात्सल्य होते. आणि आशीर्वादाचे बळ होते. रोहिदासाने पुन्हा एकदा नमस्कार केला. खूप वेळात आईवडिलांची भेट झाली नव्हती. धावतच तो त्या तलावाकडे गेला. दूरवर आई दिसली. वडील दिसले. 'आईऽऽ...तातऽऽ' तो हाका मारीतच त्यांच्या जवळ गेला. तारामतीने त्याला हृदयाशी घट्ट दाबून धरले. नदी सागराला मिळाली. रोहिदासाच्या अश्रुप्रवाहात तिचे अश्रू एकरूप झाले.

ती रात्र त्यांनी त्या तलावाकाठी काढली. काशीनगरीच्या ते अगदी जवळ पोहोचले होते. तेथे गेल्यावर स्वकष्टाने विश्वामित्राचे कर्ज कसे फेडायचे याचा विचार हरिश्चंद्र करीत होता. रात्र याच विचारात गेली. सकाळी पुन्हा पदयात्रा सुरू झाली आणि जाता-जाता हरिश्चंद्राला विचार सुचला की, नगरात जाताना लाकडाच्या मोळ्या घेऊन जाऊ. त्या विकून आजचा दिवस भागवू. मग पुढे काय करता येईल ते पाहू.

डोक्यावर लाकडांच्या मोळ्या घेऊन तिघांनीही काशी नगरात प्रवेश केला. कोठे जायचे, कसे जायचे, हे काहीही माहीत नव्हते. ईश्वरावर सगळा हवाला होता. एवढ्यात एकाने हटकले,

'ए मोळीविक्या, नवीन दिसतो आहेस.'

'होय महाराज.'

'विकायला आणल्यास काय?'

'होय.'

'टाक माझ्या घरी. चल माझ्याबरोबर. घरी देतो पैसे. अन् काय रे रोज मोळ्या आणतोस काय विकायला?'

'नाही हो! आजच...' हरिश्चंद्राचा आवाज कंपित झाला. त्याला बोलवेना. ते पाहून तो माणूस म्हणाला,

'म्हणजे?'

हरिश्चंद्राने आपली सारी हकीगत त्या माणसाला सांगितली आणि म्हणाला,

'काही काम शोधून द्याल तर उपकार होतील आपले.'

'असं म्हणतोस? बरं, मला काय दलाली देशील?'

'आपण सांगाल ती. आपण गरिबाकडे जास्त का मागणार? आणि मी तरी जास्त काय देणार?'

दोघांचे बोलणे झाले. काशीविश्वेश्वराचे दर्शन घेऊन तिघेही स्मशानाजवळच्या वखारीत आले. त्या माणसाने या तिघांनाही लाकडे फोडायच्या कामाला लावले आणि तो आपल्या उद्योगाला निघून गेला.

सकाळी उठल्यापासून दुपारपर्यंत लाकडे फोडायची. माध्यान्हीला मिळेल ती ओली कोरडी भाकरी खायची. जरासे भूमीवर अंग टाकायचे अन् थोड्याच वेळात पुन्हा लाकडे फोडायला सुरुवात करायची. तिघांचा दिनक्रम सुरू झाला. रोहिदास आपल्या आईवडिलांना रोज मदत करीत असे. त्याला कष्टाची सवय नव्हती तरी आल्या परिस्थितीला तोंड द्यायला तो खंबीरपणे उभा होता. या कष्टातून पैसे साठवून त्याला विश्वामित्राचे कर्ज फेडायचे होते. एक हजार मोहरांचे! एका वर्षात!!

पाच महिने उलटून गेले. एके दिवशी सकाळीच विश्वामित्र वखारीत आले. हरिश्चंद्राने त्यांचे स्वागत केले. रोहिदासही जवळच होता. त्याला त्यांनी विचारले,

'काय, बरं चाललं आहे ना?'

'आपल्या कृपेनं, आणि आई-वडिलांच्या पुण्याईनं मी सुखात आहे.'

'वा, अजून पीळ गेला नाही म्हणायचा.'

'मुनिवर, आमच्या रक्तातला स्वाभिमान, हा सदैव जागृतच असणार. त्यामुळे तो पीळ जाणार कसा? बरं, आज आपण का येणं केलंत? —हरिश्चंद्राने विचारले.

'हरिश्चंद्रा, आज आपल्या कराराचे पाच महिने संपले. सहा महिन्यांनी तू पाचशे मोहरा देणार होतास तेव्हा आतापर्यंत तुझी काय

प्रगती आहे हे पाहण्यासाठी आलो.

'चलावं मालकाकडे. आता आपल्याला सांगतो.'

दोघंही मालकाकडे गेले. हरिश्चंद्राने पाच महिन्यांत किती रक्कम शिल्लक राहिली आहे हे विचारले.

'हरिश्चंद्रा, अरे या महागाईच्या दिवसांत तुम्हांला तिघांना खायला घालायला लागतं. तू काम ते काय करतोस आणि शिल्लक ती काय विचारतोस? अगदी काटेकोर हिशेब करायचा झालाच तर थोडेसे पैसे तुझ्याकडूनच येणं निघेल.'

'काय...माझ्याकडून येणं —?'

'अरे, तू गरीब, मी काही ते तुझ्याकडून घेणार नाही.' मालकाने सात मजली हास्य केले आणि विश्वामित्राकडे पहात आपले डोळे मिचकावले. विश्वामित्र म्हणाले,

'काय हरिश्चंद्रा, माझं देणं आता कसं देणार?'

'महाराज, माझ्या शब्दाला मी जागेन. कांहीही करून मी आपल्या पाचशे मोहरा आपल्याला देईनत.'

'हो, पण कशा रीतीने?'

'महाराज, आवश्यकता पडली तर माझा आणि माझ्या पत्नीचा देह कामासाठी विकून, गुलाम होऊन आपलं ऋण फेडीन.'

'तेच सुचवायला मी आलो होतो. येथल्या गुलामांचा कायद्रा असा आहे की गुलामाला एक महिना वागवून बघतात आणि मग पैसे देतात. तुला जर क़रार पाळायचा असेल तर आज सूर्यास्तापर्यंत कोणाची तरी विक्री झाली पाहिजे.'

'जशी आज्ञा.'

विश्वामित्र निघून गेले. वखारवाला हरिश्चंद्राच्या, तारामतीच्या विक्रीच्या कामाला लागला. दलाली कोण सोडणार? रोहिदासाने हे सारे ऐकले होते. तो आईकडे आला. पाठोपाठ हरिश्चंद्रही होता. त्याने आईला सांगितले,

'आई, आज आपल्याला विकायचं आहे म्हणे! पण आई, आपल्याला विकायचं म्हणजे काय ग? तू, मी काय भाजी आहे, का धान्य आहे, का लाकडं आहोत? आपण पदार्थ विकतो; पण माणसं कधी विकतात का ग?'

या त्याच्या प्रश्नाला तारामती काय उत्तर देणार होती? ती फक्त म्हणाली — 'माणसं विकायची म्हणजे...माणसं विकायची... बाळ, तुला नाही कळणार..' ती सांगू शकत नव्हती. तिने रोहिदासाला जवळ घेतले. त्याच्या पाठीवर तिचे हात फिरत होते. अन् मस्तकावर अश्रू घरंगळत होते. हरिश्चंद्र खिन्न मनाने हे दृश्य शून्य दृष्टीने पहात होता.

संध्याकाळी गुलामाच्या चौकात गर्दी झाली होती. अयोध्येचा राजा आणि राणी यांची विक्री होणार होती. सगळे आशेने, उत्सुकतेने आले होते. काही नुसतेच बघे होते. विश्वामित्रही हजर होते. हरिश्चंद्र गुलामांच्या चौथऱ्यावर उभा राहिला. वखारवाल्याने दलालींच्या अपेक्षेन या विक्रीचा आरडाओरडा खूप केला होता. त्याने विक्रीला सुरुवात केली, तो म्हणाला,

'बोला, अयोध्येचा राजा, स्वतःची विक्री करीत आहे. याला विकत घ्यायला जो तयार असेल त्याने किंमत बोलावी...

आपापसांत कुजबुज सुरू झाली. दोघेतिघे किंमत बोलले; पण एक मोहोरेच्यावर त्याची किंमत येईना. विश्वामित्र म्हणाले,

'राजा, तुला एक मोहरेपेक्षा कोणी जास्त किंमत देत नाही.'

'मुनिवर, या काशी नगरात, अयोध्येचा राजा एका मोहरेलाही जात नाही हे खरं आहे. तरी काही हरकत नाही. धर्माने माझ्या पत्नीचे कष्ट विकण्याचा अधिकार पती या नात्याने मला आहे. मी तिचीं कष्टासाठी मोलकरीण म्हणून विक्री करून आपला पहिला हप्ता देईन.'

हरिश्चंद्राने खरोखरच तारामतीची विक्री आरंभिली. तिचे सौंदर्य पाहून सारे मोहित झाले. राजाची राणी आपल्याकडे मोलकरीण आहे, या कल्पनेने काहीजण सुखावले आणि तिची किंमत हां हां म्हणता वाढू लागली. कांचनबाई नावाच्या सावकार पत्नीला तर 'ही मोलकरीण छान आहे.' असे वाटले आणि शिवाय आपले वैभव दाखविण्याची संधी मिळाली; म्हणून तिला फार आनंद झाला. 'माझ्या घरी राजाची राणी मोलकरीण आहे.' या भावनेनेच तिने तारामतीला पाचशे मोहरांना विकत घेतले. गाईबरोबर वासरू जाणारच. तारामतीबरोबर रोहिदासही आलाच!

तारामती नवीन मालकिणीबरोबर चालू लागली. रोहिदासही आईचा हात धरून चालू लागला, तो कांचनबाई ओरडली,

'ए रोह्या, मांझा शेला घे; आणि चल माझ्यापुढे.'

मानी मन काम ऐकायंला तयार होईना. आईने खूण केली. रोहिदासाने शेला घेतला. आईचे बोट सोडले नाही.

'अरे, माझ्यापुढे चल म्हणून सांगितले ना.'

'मी आईचा हात धरून येतो ना.'

'म्हणे, आईचा हात धरून येतो. मी सांगते तसं वागलं पाहिजे. तू माझा गुलाम आहेस.'

कांचनबाईचा अहंकार जागा झाला, 'गुलाम' हे शब्द तारामती आणि रोहिदासाच्या कानांत उकळत्या तेलाप्रमाणे वेदना निर्माण करीत होते. गुलामगिरी! म्हणजे अब्रूची विक्री!! सत्त्व, अस्मिता यांची राखरांगोळी! गुलामगिरी म्हणजे स्वत:च्या आशा, आकांक्षांचा, स्वत:च्या मनाचा, भावभावनांचा मृत्यू!! गुलामगिरी म्हणजे जिवंत मरण!!

रोहिदासाला हे जीवन नवीन होते. परिस्थितीने आणखी एक दु:खाचे ताट समोर मांडले होते. त्यातून कांचनबाईला मूल नव्हते. अशा स्थितीत वास्तविक रोहिदासाचे तिने लाड करायला हवे होते; पण घडत होते उलटे. आई-मुलाचे प्रेम तिला पहावत नव्हते. तिचा जळफळाट होत होता. रोहिदास तिला नकोसा वाटू लागला. याचा परिणाम असा झाला की रोहिदासाचे कष्ट वाढले. जेवण वेळेवर मिळेनासे झाले. मिळायचे तेही पोटभर नाही. कधी अर्धपोटी तर कधी उपाशीपोटी, त्याला काम करावे लागे. कामात चूक झाली तर मारहाण होई. हे सारे तो धैर्याने सहन करीत होता. तारामतीला हे सारे उघड्या डोळ्यांनी पहावे लागत होते.

पाच- सहा महिन्यांत रोहिदासाची कळा पार बदलली, थकलेले हात, भांडी घासताना, धुणे धुताना, दळताना साथ देईनासे झाले. पोटातील आग पाण्याने विझेनाशी झाली. तरीही त्याने आईने सांगितल्याप्रमाणे आचरण ठेवले होते. खाण्यासाठी कोणापुढे हात पसरला नव्हता. खात असताना कोणापुढे जाऊन उभा राहिला नव्हता. कधी भूक लागली असे म्हणत नव्हता. ज्या धैर्याने तो या संकटांना तोंड देत होता ते धैर्य वाखाणण्यासारखे होते. कुलाचे ब्रीद त्याने राखले होते. कांचनबाईला या त्याच्या वागण्याचेच वाईट वाटत होते की, हे पोरगे एवढे चांगले वागते कसे? कधीही हात कसा पसरत नाही. एवढा करारीपणा, एवढे

धैर्य याने आणले कोठून? याचे उत्तर तिला सापडणे शक्य नव्हते. तिचा जळफळाट वाढत होता; पण हे पोरगे 'आपण सतत केलेल्या उपासमारीने मेले असा आक्षेप येऊ नये म्हणून तिने खूप दानधर्म केला. तीन-चार दिवस ओळीने हलवायांची दुकाने गोरगरिबांकडून लुटविली. सगळी काशीनगरी कांचनबाईच्या अन्नदानाची स्तुती करू लागली.

रोहिदासाला व तारामतीला मानसिक यातना देण्यासाठी तिला आणखी एक युक्ती सापडली. अन्नदान केलेल्या दुकानांवरून यांना फिरवून आणले तर यांना क्लेश होतील म्हणून तिने तारामतीला बोलावले. आणखी एकदोन दासींना बोलाविले आणि आज्ञा केली,

'जा ग, या तारामतीला आणि या रोह्याला बाजारपेठेतून हिंडवून आणा. आपलं अन्नदान कसे झाले आहे ते पाहून या.'

'बाईसाहेब, मी जाते. या लेकराला कशाला?' तारामतीला तिचा कावा कळला. तिनं विनवणीच्या सुरात सांगितलं,

'मी सांगते ना, जा त्याला घेऊन. तू गुलाम आहेस, मी सांगेन तसं ऐकलं पाहिजे आणि लक्षात ठेव, तुमच्या मागोमाग अन्नदानाचा सोहळा पाहण्यासाठी मी पण येणार आहे; तेव्हा रोह्याला नेलास की नाही हे मला समजेल. तो जर दिसला नाही, तर याद राख. चामडी लोळवीन एकेकाची!'

कांचनबाई फणकाऱ्याने निघून गेली. तारामती, रोहिदास आणि दासी अन्नदान केलेल्या रस्त्याने जाऊ लागल्या. गोरगरीब हवी तेवढी मिठाई नेत होते. रस्त्याने लाडू पडत होते, ते उचलण्याचेही भान त्यांना नव्हते. इतकी मिठाई लुटली होती की, अनेकजण तर रस्त्यातच ओझे झाले म्हणून पुढून येणाऱ्या माणसाला मिठाई देत होते. तो तृप्त होत होता. त्याला दुकानाकडे जाण्याचे कारणच नव्हते. अशा रस्त्याने रोहिदास चालला होता. त्याच्या पोटात मात्र आग पडली होती, आणि भोवताली पडले होते मिठाईचे ढीग! रोहिदासाने त्या लोकांच्याकडे पाहिलेही नाही. जणू नियतीने दिलेली ही क्रूर शिक्षा भोगायलाही तो तयार होता, कुरकूर न करता.

योगायोग मोठे विचित्र असतात. रोहिदास अशा स्थितीत भटकत असता हरिश्चंद्र त्यांना शोधीत तेथे आला.

'रोहिदासा, वरं झालं गाठ पडली. विश्वामित्रांना सुवर्ण मोहरांचा दुसरा हप्ता देण्याची मुदत आज संपते आहे. तेव्हा माझीही विक्री आज करायची आहे. गुलामगिरीत पडण्यापूर्वी तुमची गाठ घ्यावी म्हणून तुम्हालाच शोधीत होतो.'

'नाथ..'

'तात...तुम्हांला पाहिलं आणि किती आनंद झाला.'

'मला वाटलं, तुझ्या मालकिणीनं चालविलेल्या या सोहळ्यात तू मला विसरला असशील. तुला खूप खाऊ मिळत असेल तेव्हा..'

'नाथ...ऽऽ' —तारामती.

'तारामती, तू अशी केविलवाणी का हाक मारलीस?'

'नाथ, रोहिदास आपला मुलगा आहे. करारी आहे. या सोहळ्यात तो आपल्याला कसा विसरेल? त्याने अन्नाचा एक कणही तोंडात घातला नाही, नाथ,'

'बाळा, खरंच, माझंच चुकलं...'

'नाही तात, मला हे असलं पाहून कधी भूकच लागली नाही. मालकिणीला वाटलं आम्हांला असं हिंडवलं म्हणजे आमच्या तोंडाला पाणी सुटेल. कसं शक्य आहे हो ते? या कांचनबाईनं तर मिठाईचं दान केलं; पण तात, तुम्ही तर अयोध्येच्या चौकाचौकांतून सुवर्णाचे ढीग लुटविले होते.'

'बाळा, ...काही बोलू नकोस.' हरिश्चंद्राने विषय बदलला. तो पुन्हा म्हणाला,

'रोहिदासा, आज मी एक गंमत आणली आहे.'

'खाऊ आणलात? मग द्या ना मला. आता मला भूक लागली आहे.'

'माझ्या कष्टानं मिळविलेल्या पैशाची ही शेवटची भाकरी आणली आहे. आज आता मीही गुलाम होणार.'

'नाथ, द्या... द्या ती भाकरी रोहिदासाला.'

'ती भाकरी आपल्या कष्टाची आहे. असली कष्टाची भाकरीच धैर्याचं संगोपन करते. स्वत्वाची जपणूक करते. रोहिदास ती भाकरी घे. तीच तुझं धैर्य वाढवील. आणि विश्वामित्राला दाखवून देईल की, कष्टार्जित अन्नावर ज्यांचा पिंड पोसला आहे ते ताठ मानेनेच जगतात.

कष्टार्जित अन्नच त्यांना संकटकाळात बळ देते. धैर्य देते.'

'कोण म्हणतं रोहिदास धैर्यवान आहे? ताठ मानेनं जगतो आहे?' विश्वामित्र रागारागाने विचारतच तेथे आले.

'मी...'

'कोण, तारामती? आपल्या मुलाच्या मायेमुळे कोणतीही माता आपल्या मुलाला चांगलेच म्हणत असते. तारामती, त्याचे गुण तू गायचे नाहीस. जगाने मान्य केले पाहिजेत., ती कांचनबाई सांगत होती, ह्या रोह्याला कितीही खायला घातले तरी पुरत नाही. सारखा खात असतो, तरी भूक भूक करतो. हाकलून देणार आहे ती त्याला.'

'महाराज, काय म्हणता आपण हे..? माझा बाळ तीन दिवसांचा उपाशी आहे.'

'मी म्हणत नाही. ती कांचन सांगते. बाहेर कळलं, ते तुला सांगितलं; आणि हरिश्चंद्रा, तुला खरेदी करणारा डोंब माझ्या मागेच येत आहे. त्याला जेव्हा भुकेचा हा प्रकार कळाला आणि रोहिदासाला सांभाळावं लागेल हे कळलं त्यावेळी तोही चारशे मोहरांच्यावर एक मोहोर द्यायला तयार नाही.'

विश्वामित्रांचे भाषण संपायच्या आतच डोंबही तेथे पोहोचला होता. तो म्हणाला, 'हां, ह्या पोराला पोसायचं म्हणजे मी तुला चारशे मोहरांनाच घेईन. अन् त्येबी स्मशानात कामाला चांगला धडधाकट माणूस हाये म्हनून चारशे मोहरा!'

'महाराज, मला पाचशे मोहरांची आवश्यकता आहे. मला कर्जमुक्त होऊ द्या. मग मी गुलामगिरीत यायला तयार आहे.' हरिश्चंद्र काकुळतीने म्हणाला,. तारामती मान खाली घालून ऐकत होती. रोहिदासाची चुळबूळ चालू होती. डोंब परत म्हणाला, 'नाय बा, चारशेच्यावर आपण एक मोहर देनार नाय.'

'बा, डोंबा, माझी भूक खरंच अशी नाही रे. तू माझ्या पिताजींना पाचशे मोहरांना विकत घे.' रोहिदासाने विनवणी केली.

'तू म्हनतोस भूक मोठी नाय म्हनून पन हे विश्वामित्र सांगत्यात, सारं गाव सांगतंय ते काय खोटं हाय?'

'डोंबा, मी सत्यवचनी हरिश्चंद्र महाराजांचा मुलगा आहे. खोटं बोलणं मला कधीच माहीत नाही. त्यातून मी क्षत्रिय. कष्टाच्या अन्नावर

जगायचीं सवय आहे मला.'



'असं बोलनं समदीच बोलत्यात पन येळ आली की, भूक लागली की हात म्होरं करत्यात. काय दिसंल त्ये तोंडात भरत्यात.'

'डोंबा, माझ्या बाळाला कष्टाची भाकरी मालकिणीनं मिळू दिली नाही, म्हणून तो तीन दिवसांचा उपाशी आहे.'

'कंटाळवाणे भापण ऐकून विश्वामित्र म्हणाले, 'बोल हरिश्चंद्रा, काय करणार आहेस? शंभर मोहरांचं काय?'

'डोंबा, मला पाचशे मोहरांना विकत घे. मी कर्जमुक्त होऊन तुझी चाकरी करायला येतो.'

'पन या पोराचं काय?'

'डोंबा, माझीच तुला भीती वाटते ना? माझी भूकच बाबांच्या पाचशे मोहरांच्या आड येतेय ना?'

'व्हय...नायतर या आता पाचशे मोहरा मी देतो.'

'मग ठीक आहे. ऐक तर. या विश्वामित्रमुनींच्या साक्षीनं मी प्रतिज्ञा करतो की, जोपर्यंत माझे आईबाबा गुलामगिरीत आहेत तोपर्यंत

अन्नाचा एक कणही मी खाणार नाही.'

'बाळा...रोहिदासा, ही कसली प्रतिज्ञा.' —तारामती मटकन् खालीच बसली. त्या बाल देहाकडे पाहून विश्वामित्र अवाक् झाले. त्यांनी मान खाली घातली. डोंबही 'आ' करून त्या बालमूर्तीकडे पाहू लागला. हरिश्चंद्राला काय बोलावे हे सुचेना. त्याची प्रतिज्ञा क्षत्रिय कुलाला शोभेशी होती. धैर्यानं संकटाला सामोरी जाणारी तर होतीच; पण प्रत्येक शब्द हृदयाचा ठाव घेणारा होता. कसे तरी शब्द गोळा करून हरिश्चंद्र म्हणाला,

'बाळा, आज गुलामगिरीत शिरताना तू माझा गुरू झाला आहेस. संकटांना धैर्याने कसे तोंड द्यावे हे तू मला शिकवलं आहेस. भूक ही माणसाची प्राथमिक गरज; पण तीही तत्त्वासाठी तू नाकारलीस. धन्य धन्य आहे तुझी !'

आपण काय करतो आहोत, हे समजायच्या आतच हरिश्चंद्र रोहिदासाच्या पायावर पडला होता. डोंब चकित होऊन पैशाची थैली विश्वामित्राच्या हातावर देत होता, लज्जित नेत्रांनी विश्वामित्र हे दृश्य टिपीत असतानाच न कळत त्यांचे हात पैसे घेण्यासाठी पुढे झाले होते. अन् तारामती...तारामती कोसळलेले आभाळ आपल्या हातांनी छातीशी सावरीत होती. रोहिदास धैर्याने उभा होता. एका दिव्य तेजाने तो तळपत होता.

• • •

# २. भक्तीचा पाहुणा

सूर्योदयाच्या वेळेलाच दुर्वासऋषी आलेले पाहून अंबरीष राजाला समाधान वाटले. त्यांना वंदन करून तो म्हणाला,

'मुनिवर्य, आज एकादशीच्या व्रताचं पारणं आहे. आपणं माझे अतिथी आहात. भोजनाची सिद्धता आहे. भोजन करून माझ्या आतिथ्याचा स्वीकार करावा.'

'तथास्तु.'

दुर्वास ऋषींनी राजाला अनुमती दिली; आणि म्हणाले,

'राजा, यमुनेवर जाऊन स्नान-संध्या आटोपून येतो. मग भोजनाला बसू.'

'जशी आपली इच्छा.'

दुर्वास निघून गेले.

राजा अंबरीष एकादशीचे व्रत नित्य नियमाने करीत असे. दशमीच्या दिवशी एकभुक्त रहायचे. एकादशीच्या दिवशी उपवास करायचा. उपवास म्हणजे जवळ बसणे. परमेश्वराच्या सानिध्यात बसणे, त्याचे स्मरण करणे, भजनपूजन करीत निराहार राहणे हाच खरा उपवास!

द्वादशीच्या दिवशी पाच घटका दिवस वरती आला की, कोणी अतिथी अभ्यागत आहे की नाही ते पाहून, राजा पारणे करीत असे. दुर्वासांसारखा, श्रेष्ठ योग्यतेचा ऋषी, आज अतिथी म्हणून लाभला होता. राजाला धन्यता वाटली. कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. तो त्यांची वाट पाहू लागला.

दिवस वरती येत होता. सूर्योदय होऊन चार घटका लोटल्या होत्या. दुर्वास मुनी अजून परतले नव्हते. जसजसा वेळ जाऊ लागला तसेतसे राजाचे लक्ष त्यांच्या वाटेकडे लागले. दुर्वास अजूनही आले नव्हते. राजाच्या मनात चलबिचल सुरू झाली. राजा अस्वस्थ झाला.

हे सारे राजपुरोहिताच्या लक्षात आले. त्याने सांगितले, 'महाराज,

चरणी एक विनंती आहे.'

'बोला,'

'महाराज, दिवस वर येऊन पाच घटका होत आल्या आहेत. नैवेद्य समर्पण करून पारणं केलं नाही तर व्रतभंग होईल.'

'खरं आहे; पण गुरुजी, सांगितलेल्या अतिथींशिवाय भोजन कसं करायचं? ते अनुचित होईल.'

'भोजन करू नये; पण नैवेद्य समर्पण करावा आणि शालीग्रामाच्या शिळेचं तीर्थ घेऊन पारणं सोडावं.'

राजाने विचार केला. त्यालाही त्यांचे म्हणणे पटले. नुसते तीर्थ घेतले तर भोजन केले असे होणार नाही आणि पारणेही शास्त्रशुद्ध रीतीने केल्याने व्रतभंगही होणार नाही. त्यामुळेच राजाने पुरोहिताचे सांगणे मानले. नैवेद्य समर्पण केला. तीर्थ घेतलं. राजा वाट पहात बसला. एवढ्यात दुर्वास दाण् दाण् पावले टाकीत तेथे आले. अंतर्ज्ञानाने त्यांना सारा प्रकार समजला होता. त्यांचे ते उग्र स्वरूप पाहून राजा घाबरला. क्षणभर काय होत आहे, हेच त्याला समजेना. दुर्वास महालात आले. रागारागानेच ते म्हणाले,

'राजा..'

अंबरीष भानावर आला. सारी शक्ती एकवटून तो म्हणाला,

'यावं यावं, मुनिवर. मी आपलीच वाट पाहत होतो.'

'वा... म्हणे, आपलीच वाट पाहत होतो. अतिथीला बोलावलंस आणि मी यायच्या आधी पारणं सोडलंस, मला काय समजलास? हीच का माझी किंमत?'

दुर्वासांचा अहंकार दुखावला गेला. 'मी'ची सत्ता बुद्धीवर सुरू झाली. मनाचा समतोल ढळला. मनाचा समतोल ढळविणारा; आणि मानसिक शांतता बिघडविणारा क्रोध हा एक भयंकर विकार आहे.

दुर्वास रागाने लाल झाले. काय बोलावे ते राजाला सुचेना. कसे तरी त्याच्या मुखातून शब्द उमटले,

'मुनिवर, शांत व्हा. मी आपल्या आधी भोजन केलं नाही. फक्त तीर्थ घेऊन..'

'बस्... माझ्या आधी उपवास सोडलास ना? हीच का तुझी रीत? हा माझा अपमान आहे.'

'आपला अपमान करावा म्हणून मी हे केलं नाही. आपण शांत होऊन विचार करावा आणि..'

राजाची विनंती ऐकायच्या मन:स्थितीत दुर्वास नव्हते. क्रोधाने ग्रासलेल्या अंत:करणात पेटलेली असते आग! हलाहलासारखी! विचारांना जाळणारी अन् शांततेचे स्मशान करणारी!! संतप्त दुर्वास कडाडले,

'राजा, या दुर्वासाला विचार करायला वेळ नाही. माझी वाट न पाहता तू पारणं केलंस हे अत्यंत अनुचित केलेस. मुक्तीच्या आशेने तू हे करतोस नाही का? पण लक्षात ठेव—माझ्या अपमानानं तुला मुक्ती तर मिळणार नाहीच पण या भूतलावर पुन्हा दहा जन्म घ्यावे लागतील.'

दुर्वास क्रोधाने थरथरत उभे होते. त्यांची शापवाणी ऐकून अंबरिषाला फार वाईट वाटले. 'व्रतभंग होऊ नये म्हणून केलेले कृत्य शापाला कारण व्हावे ना?' या विचाराने तो सद्गदित झाला. त्याचा कंठ दाटून आला. डोळ्यांतून अश्रू झरू लागले. त्याने अंत:करणापासून भगवंताला साद घातली.

'हे करुणाकरा, दयाघना, तुझ्या व्रताची सांगता भक्तिभावनेने करीत असताना मला शाप मिळावा ना! मला शापाचं वाईट वाटत नाही; पण व्रतपालनाची परिणती ही अशी व्हावी, यानं मन विपण्ण बनलं आहे. हे हृषिकेशा, सांग. माझी काय चूक आहे? तू पतित पावन आहेस. दीनोद्धारक आहेस. सांग. यात माझा अपराध कोणता?'

भक्तीच्या आर्ततेने, जीवीच्या जिव्हाळ्यानं आणि हृदयाच्या ओलाव्याने मारलेली हाक परमेश्वराला पोहोचते. देव भावाचा भुकेला असतो. भक्तीचा पाहुणा असतो. तो भक्तासाठी धावून येतो.

अंबरिषाचा धावा ऐकून प्रत्यक्ष विष्णू प्रगट झाले. शंख, चक्र, गदाधारी असे विष्णूचे स्वरूप पाहून राजाला आनंद झाला. राजाने लगेच साष्टांग नमस्कार केला. आपला वरद हस्त राजाच्या मस्तकावर ठेवून विष्णू म्हणाले,

'राजा, अनन्य भक्तिभावाने तू माझं व्रत केल्याने मी तुझ्या भक्तिप्रेमाने बद्ध झालो आहे. तुझे संकट निवारणे माझे कर्तव्य आहे. काही काळजी करू नकोस, तुझ्यासाठी या पृथ्वीवर मी दहा वेळा जन्म घेईन.'

भगवंताचे हे अमृत मधुर बोल ऐकून राजाला गहिवरले. त्याने लगेच मोठ्या भक्तिभावाने भगवंताचे पाय धरले.

दुर्वास हा सारा प्रकार पहात होते. अंबरिपासाठी भगवान विष्णू आलेले पाहून प्रथम त्यांना आश्चर्य वाटले; आणि आपला शाप विष्णू स्वत: भोगणार आहेत हे ऐकून त्यांचा राग आणखी वाढला. 'मी ज्याला शिक्षा दिली ती शिक्षा दुसरा कसा घेणार? अंबरिपाला तो मोकळा सोडणार? ' या विचाराने ते अस्वस्थ झाले.

विकार आंधळे असतात. क्रोधाने अंधळा झालेला माणूस, ज्याने आपल्याला दु:ख दिले, त्याच्याचकडे पाहतो, थोडे थांबून; मागे वळून, आत्मपरीक्षण करण्याचे भान त्याला रहात नाही.

'माझा शाप फोल होणार.' हे दु:ख त्यांना सलू लागले. मनातला 'मी' फणा काढून उभा राहिला. डंख मारण्यासाठी! कारण त्यांचा अहंकार दुखवला गेला ना?' घनीभूत अहंकार म्हणजेच क्रोध!

दुर्वास रागावले. पुन्हा रागावले. कशासाठी तर अंबरिपाला जगातून नाहीसा करण्यासाठी! त्यांचा क्रोध अनावर झाला.

त्यांनी आपल्या जटेतला एक केस तोडला. मंतरला आणि अंबरिपावर टाकला. त्याला मारण्यासाठी!

जवळ उभे असणारे विष्णू हे सारे पहात होते. भक्त-वत्सल भगवंतांनी हे जाणले. त्यांनी आपले चक्र त्या केसावर सोडले. दोघे एकमेकांवर आपटताच प्रचंड शक्ती निर्माण झाली. केस जळून गेला. ते पाहून दुर्वास घाबरले. केसाचा नाश करून ते चक्र त्यांच्या दिशेने पुढे सरकले. अंगावर येत असलेल्या चक्राच्या कचाटच्यातून सुटण्यासाठी दुर्वास पळत सुटले.

चक्र मागे लागले. 'आता आपल्याला यातून कोण मुक्त करू शकेल?' विचार करता-करता दुर्वासांना ब्रह्मदेवाची आठवण झाली. तो सृष्टिनिर्माता असल्याने तोच यातून मुक्त करू शकेल असे वाटल्यावरून दुर्वास ब्रह्मदेवाकडे गेले. घाई घाईने धावत- पळत आलेल्या दुर्वासाला पाहताच ब्रह्मदेव म्हणाले,

'दुर्वासा, आज असा घाईने आलास? आणि तू इतका घाबरलास कशाने?'

'देवा, आपण सर्वज्ञ आहात आणि माझ्याच तोंडून हे सारं कशाला

वदवता? हे विष्णूचं चक्र मागे लागलं आहे..'

'हं आलं लक्षात, दुर्वासा, इतकी वर्षे तपश्चर्या केलीस; पण अजून इंद्रिये आणि विकार ताब्यात ठेवता येत नाहीत? अरे, 'मी' कोणीतरी आहे, याला धक्का बसला की, क्रोध उत्पन्न होतो. या क्रोधानं अविवेक. अविवेकानं कर्तव्याविषयी स्मृतिभ्रंश निर्माण होतो. भ्रष्ट स्मृती निश्चयात्मक बुद्धी नष्ट करते, आणि त्यातून सर्वनाश उद्भवतो. हे सारं संकट तुझ्या क्रोधानं निर्माण झालं आहे.'

'देवाधिदेवा, मला हे सारं मान्य आहे; पण आता यातून माझी सुटका..'

'दुर्वासा, हे विष्णुचक्र आहे. त्याची शक्ती विलक्षण आहे. मी भगवान विष्णूच्या आज्ञेनं वागत असतो. त्यांच्या शक्तीचं निवारण मी कसं करू शकणार?'

'तरीही काहीतरी उपाय..आपण भगवान विष्णूंना सांगितलं तर..'

'ते कठीण आहे. त्या बाबतीत मी असमर्थ आहे. तू शंकराकडे जाऊन बघ.'

ब्रह्मदेवाने निराशा केलेले दुर्वासमुनी पुन्हा धावू लागले. चक्राने अजून पिच्छा सोडला नव्हता. भगवान शंकर भक्तावर लवकर प्रसन्न होतात. आपल्यालाही ते पाठीशी घालतील असे वाटल्यावरून दुर्वास कैलासावर पोहोचले.

शंकर ध्यानस्थ बसले होते. दुर्वास धावतच तेथे गेले. त्यांनी शंकराची प्रार्थना केली. थोड्याच वेळात त्यांनी डोळे उघडले. दुर्वासांना तशा स्थितीतही जरा हलके वाटले. आपली सगळी कहाणी शंकरांना सांगून ते म्हणाले,

'देवा, महादेवा, ब्रह्मदेवानं आपल्याकडे जायला सांगितलं म्हणून मोठ्या आशेनं मी येथे आलो आहे. आपण पतित पावन आहात. दीनांचा उद्धार करणारे आहात. देवा, मी तुम्हाला अनन्यभावाने शरण आलो आहे. माझ्यामागे लागलेल्या या चक्राचं आपण निवारण करावं.'

शंकरांनी जाणलं. 'याचा अहंकार कमी झाला आहे. तरी भगवान विष्णूंची महती याला कळलेली दिसत नाही. तेथेच विष्णूंना शरण जाण्याऐवजी हा सगळीकडे पळत सुटला आहे. याला परत तेथेच पाठवले पाहिजे आणि विष्णूंच्याकडूनच भगवत् भक्तीची थोरवी ऐकविली पाहिजे.

म्हणजे याला कळेल, स्वत:चा उद्धार होण्यासाठी ज्ञानाला भक्तीचा ओलावाही आवश्यक असतो..' शंकर त्याला म्हणाले,

'दुर्वासा, तुझी व्यथा मी जाणतो; पण भगवंताची ही शक्ती परत घेण्याचं सामर्थ्य फक्त त्यांच्याचकडे आहे. तू त्यांनाच शरण जा. ते भक्तवत्सल आहेत. तेच यातून मार्ग काढतील.'

भगवान शंकरांनीही निराशा केलेली पाहून दुर्वास हताश झाले; पण पाठीमागे लागलेल्या चक्राचे निवारण करणे आवश्यक होते. जीवन आशेच्या शृंखलांनी बांधलेले माणूस वेड्यासारखा धावत असतो. एका ठिकाणी पदरी निराशा आली तर तेथे न थांबता तो दुसरा आसरा शोधत असतो.

दुर्वास धावत-धावत, दीनवाण्या मुद्रेने विष्णूंकडे आले. त्यांना साष्टांग नमस्कार करून म्हणाले,

'हे भगवंता, माझी चूक झाली. मला क्षमा करा. ह्या चक्राचं निवारण करा. माझा ताप नाहीसा करा.'

हे ऐकताच विष्णूंनी मंद स्मित केले. ते म्हणाले,

'दुर्वासा, माझं हे चक्र माझ्या आज्ञेत कोठे आहे?'

'म्हणजे... देवा, माझी थट्टा करता होय? नका... मेलेल्याला अधिक मारू नका. तुमची लीला अगाध आहे. मला सारं पटलं आहे. माझा असा अंत पाहू नका. देवा, तुम्ही भक्तवत्सल आहात...'

'होय. मी भक्तवत्सल आहे. म्हणून तर कठीण झालं आहे.'

'आपलं बोलणं माझ्या ध्यानी नाही आलं.'

'दुर्वासा, जे भक्त अनासक्त, शुद्धाचरणी, कर्तव्यतत्पर असतात. ज्यांना काम, क्रोधादि विकार स्पर्श करीत नाहीत, ते भक्त मला आवडतात. त्या भक्तांनी दिलेल्या प्रेमानं मी त्यांचा ऋणी होतो. त्यांचा दास होतो, त्यांची सत्ता माझ्यावर चालते. अंबरीष हा माझा अनन्य भक्त आहे, त्याचं रक्षण करणं हे माझं काम. ते मी केलं. आता, मी त्याचा ऋणी असल्यानं हे चक्र मी कसं आवरू? तू अंबरिषाकडे जा. त्याची क्षमा माग. तो तुला निश्चित क्षमा करील. दुर्वासा, एक लक्षात ठेव.. देवाला देवपण देणारे त्याचे भक्त, देवापेक्षाही श्रेष्ठ असतात.'

सारखं धावून-धावून दुर्वासांच्या जटा अस्ताव्यस्त झाल्या होत्या. श्रमाने आणि भीतीने चेहरा घामेजून गेला होता. जवळ जवळ वर्षभराच्या

श्रमंतीने अंगात त्राण राहिले नव्हते. गात्रे थकली होती. तोंड कोरडे पडले होते. कसेतरी पाय खरडत खरडत दुर्वास राजा अंबरिषाकडे परत आले आणि त्याच्या पायावर त्यांनी आपले अंग झोकून दिले.

अंबरीषही अतिथींची वाट पहात होता. भोजनाला बोलावून विन्मुख गेलेल्या अतिथीमुळे राजानेही भोजन केले नव्हते. दुर्वास अचानक अशा स्थितीत आलेले पाहताच राजाला आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला. त्याने त्यांना उठविले. तो म्हणाला,

'मुनिवर्य, हे काय, आपण अतिथी आहात. असं करणं योग्य नाही.'

'राजा, चुकलो मी. मला क्षमा कर.'

'असं म्हणू नये. हे मुनिश्रेष्ठा, आपण आपल्या चित्तवृत्ती शांत ठेवू शकला नाही. या विकारानं आपल्याला आंधळं बनवलं. नाहीतर आपल्या हातून असं कधीच घडलं नसतं.'

राजाची शांत, निरागस, अनासक्त वृत्ती पाहून दुर्वासांचे मन गलबलून गेले. डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले; आणि अहंकारही गळून गेला. विवेक जागृत झाला. भारावलेल्या अंतःकरणाने आणि ओलावलेल्या शब्दांनी दुर्वास म्हणाले,

'राजा, तुझं म्हणणं खरं आहे. अहंकार शून्यतेत विकारांना जिंकण्याचं सामर्थ्य असतं. विकारांना आवर घातल्यानेच चित्तवृत्ती शांत होते. शांत चित्तवृत्तीच मनाला आनंद देते. दुःखाचा परिहार करू शकते. राजा, क्रोध हा विकार किती भयंकर आहे, हे तू मला दाखवून दिलंस.'

'महाराज, तो माझा अधिकार नाही. ही सारी भगवंताची इच्छा!'

'राजा, हे चक्र अजून माझी पाठ सोडत नाही. त्यातून माझी मुक्तता करण्याचं सामर्थ्य तुझ्यातच आहे.'

अंबरिषानं चक्राची मनोभावे प्रार्थना केली. चक्र परत स्वस्थानी गेले.

एक वर्षाने एकादशीचे पारणे सुटत होते. दुर्वास आणि अंबरीष दोघंही आनंदात होते. भोजन झाले. राजाने त्यांची योग्य संभावना केली. त्यांना नमस्कार केला. अंतःकरणपूर्वक प्रेमाने आशीर्वाद देऊन तृप्त मनाने दुर्वास अंबरिषाच्या महालाबाहेर पडले. ● ● ● ●

# ३. सुभद्राहरण

अर्जुन तीर्थयात्रा करीत होता. फिरतफिरत तो प्रभास नावाच्या तीर्थक्षेत्री आला. स्नान, देवदर्शन करून तो पुढच्या प्रवासाला निघण्याच्या विचारात होता. तोच त्याच्या कानावर 'नारायण ऽ ऽ नारायण ऽ ऽ' असे शब्द आले. त्याने त्या शब्दांच्या दिशेने पाहिले. नारदमुनी त्याच्याचकडे येत होते.

नारद जवळ आले. अर्जुनाने त्यांना नमस्कार केला. त्याचा स्वीकार करून नारदांनी विचारले,

'अर्जुना, तू इकडे कोठे भटकतो आहेस?'

मग अर्जुनाने आपण तीर्थयात्रा का करीत आहोत हे सांगितले. ते ऐकून नारद म्हणाले,

'तरीच बलरामाने असे ठरवले बरं का!'

'बलरामाने ... काय ठरवले?'

'सुभेद्रेचे लग्न..'

'सुभद्रेचे लग्न...?' अर्जुनाला धक्काच बसला. उतावीळपणाने त्याने विचारले, "कुणाशी ठरवलं तिचं लग्न?'

'दुर्योधनाशी.'

'काय... दुर्योधनाशी?' अर्जुन रागानेच म्हणाला.

'हो. त्याच्याशीच. आत्ता मी द्वारकेतूनच येतो आहे. स्वतः बलरामाने मला सांगितले.'

अर्जुनाचा चेहरा रागाने, दुःखाने अधिकच लाल झाला. ते पाहून नारदांनी पुन्हा विचारले,

'पण काय रे, तुला एवढं रागवायला काय झालं? अरे, आपल्याला काय, कुणाचंही लग्न असलं आणि चार-आठ दिवस गोडाधोडाचं जेवण मिळालं म्हणजे झालं.'

'मुनिवर, तुमचं ठीक आहे. पण...'

'पण, काय?'

'अहो, सुभद्रेचा विवाह माझ्याशीं होणार होता. कृष्णानं तसं वचन दिलं होतं मला. बलरामालाहीं हे माहीत होतं. आणि तरींही त्याने हे असं करावं...?'

'मग काय करणार?'

'का?'

'तू हा असा बारा वर्षं तीर्थ यात्रा करींत फिरत रहाणार. तोपर्यंत तिचं लग्न काय तसंच ठेवायचं? तू नाहीं तर तुझ्याच योग्यतेचा दुर्योधन त्यांनीं पसंत केला.'

'माझ्या योग्यतेचा...? हं...! मुनिवर ते कांहीं नाहीं, हे लग्न होता कामा नये..'

'कसं शक्य आहे ते? ते काय तुझ्या हातात आहे का माझ्या? बलरामाने एखादी गोष्ट ठरविली म्हणजे ती मोडण्याची ताकद कुणामध्ये तरी आहे का?'

'पण कृष्णाला हे माहीत आहे? त्याची संमती आहे याला?'

'असणारच. त्याशिवाय का तयारी सुरू झाली आहे?'

'मग कृष्णालाच जाब विचारायला पाहिजे. त्याचीही संमती असेल तर आता तीर्थयात्रा करतोच आहे, त्यातच संन्यास घेऊन टाकतो म्हणजे पुन्हा इंद्रप्रस्थाला जायलाच नको.'

'अर्जुना, संन्यास घ्यायचा असेल तर खुशाल संन्यास घे, पण त्रिदंडी संन्यास घे.'

'तो कशासाठी?'

'तू कृष्णाला जाब विचारायला गेलास आणि त्याचं मन बदललं किंवा दुसऱ्या उपायाने सुभद्रेशी तुझं लग्न व्हायचा योग आलाच तर ही संन्याशाची वस्त्रे फेकून द्यायला बरं! म्हणून सांगितलं, संन्यास घ्यायचा तर त्रिदंडी संन्यास घे.'

आपले काम व्यवस्थित झाले आहे असे पाहून नारदांनी अर्जुनाचा निरोप घेतला. 'नारायण ऽऽ नारायण' म्हणत ते तेथून निघून गेले.

अर्जुनाने ठरविल्याप्रमाणे त्रिदंडी संन्यास घेतला. त्या वेषातच तो द्वारकेत आला. वेष बदलल्यामुळे त्याला कोणीही ओळखले नाहीं. तो सरळ कृष्णाच्या महालात गेला. कृष्णाने मात्र त्याला लगेचच ओळखले,

आणि विचारले,

'अर्जुना, अरे क्षत्रिय असताना ही संन्याशाची वस्त्रं?'

'तुमच्यामुळेच...'

'आमच्यामुळे? आम्ही असं काय केलं बाबा?'

'सुभद्रेचा विवाह माझ्याशी करून देण्याचं वचन दिलं होतंस ना? आणि आता ते मोडायला निघालास?'

'म्हणून संन्यास घेतलास होय? आणि काय रे, संन्यास घेऊन काय सुभद्रा मिळणार आहे?'

'कृष्णा, माझ्यापुढे आता दुसरा मार्गच नाही. तू माझं मन जाणतोस. तुलाच विचारायला आलो होतो की, हे तू काय आरंभलं आहेस? तुला हे सारं पसंत आहे का?'

'हे बघ अर्जुना, सर्व गोष्टी इथं माझ्या पसंतीनं चालतात असं थोडंच आहे? पण म्हणून हातपाय गाळून कसं चालेल? आत्मविश्वासानं कार्याला लागलं पाहिजे. युक्ती- युक्तीने काम करून घेतलं पाहिजे.'

'म्हणजे, अजूनही सुभद्रेचा विवाह माझ्याशी होऊ शकेल?'

'का होणार नाही? मी सांगतो त्याप्रमाणे वागशील?'

'देवा, तुझ्या शब्दाबाहेर मी जाईन का?'

'अर्जुना, तू हा वेष घेतला आहेस हे चांगलंच झालं. आता चातुर्मास जवळ आला आहे. तू सध्या रैवतक पर्वतावर रहा. तिथे तुझी सोय करतो. ध्यानधारणेत मग्न आहोत असं दाखवायचं. कोणाशीही जास्त बोलायचं नाही. पुढे मी सांगेन त्याप्रमाणे करायचं.'

कृष्णाने अर्जुनाला सर्व गोष्टी समजावून सांगितल्यावर अर्जुन द्वारकेजवळच असलेल्या रैवतक पर्वतावर राहण्यासाठी गेला. इकडे कृष्णाने कुलगुरू गर्गमुनींची भेट घेतली. त्यांच्या कानावर सर्व गोष्टी घातल्या. त्यांचा आशीर्वाद घेतला, मग तो कार्याला लागला.

थोड्याच दिवसांत सर्व द्वारकेत वार्ता पसरली की, 'रैवतक पर्वतावर फार मोठे मुनी आले आहेत. ते अत्यंत तेजस्वी आहेत. अधिकारी आहेत. ते फारसे बोलत नाहीत पण भक्ताकडे प्रसन्नतेने नुसते पाहिले तरी त्यांची इच्छा पूर्ण होते. ते स्वत: मात्र निरिच्छ आहेत.' ही वार्ता घरोघरी पसरली आणि स्वामींच्या दर्शनासाठी, त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी रैवतक पर्वतावर रोज गर्दी होऊ लागली. थोड्याच दिवसांत त्या पर्वतावर

दिवसभर जत्रां भरल्यासारखे वाटू लागले.

काहीं दिवसांतच ही वार्ता बलरामाच्या कानी गेली. त्यांनीं कृष्णाला विचारले,

'अरे कृष्णा, इथे रैवतक पर्वतावर कुणी श्रेष्ठ मुनी आले आहेत असं ऐकतो...'

'लोक म्हणतात बुवा.'

'तू त्यांच्या दर्शनाला गेला होतास का नाहीं?'

'आपल्या संमतीशिवाय कसं जाणार?'

'वाऽऽ! मोठा आज्ञाधारकच की नाहीं? अरे, आपल्या नगरींत एवढे मोठे मुनी आले आहेत त्यांच्या दर्शनाला नको जायला? त्यांचं आदरातिथ्य नको करायला? राजा म्हणून आपलं काहीं कर्तव्य आहे की नाहीं?'

'तुम्हीं म्हणत असाल तर सारीं व्यवस्था करतो.'

'मीं सांगायला कशाला पाहिजे? कृष्णा, एवढा मोठा म्हणवतोस स्वतःला पण या बारीकसारीक गोष्टी काही कळत नाहीत तुला.'

कृष्ण मिस्किलपणे हसला. मान डोलवीत तो कामाला लागला. अर्जुनाकडे योग्य त्या सूचना पाठवल्या. दुपारच्या वेळीं बलराम, कृष्ण त्या श्रेष्ठ मुनींच्या दर्शनाला गेले. जाता जाता त्या मुनींचा मोठेपणा बलरामाला साग्रसंगीत ऐकवला. त्यामुळे ते मुनी फार मोठे आहेत असे बलरामाचे मत पक्के झाले.

दोघेही त्या पर्वतावर पोहोचले. त्यांनी दर्शन घेतले. त्या मुनींचे वैराग्य, तेज पाहून बलराम प्रभावित झाले. परत निघाल्यावर ते कृष्णाला म्हणाले,

'कृष्णा, आता दोन-चार दिवसांत चातुर्मास सुरू होतो आहे. या मुनींच्या सहवासात तो काढावा अशीं कल्पना आहे.'

'दादा, कल्पना चांगली आहे, पण..'

'प्रत्येक गोष्टींत तुझा 'पण' आणि 'परंतु' कसा असतो रे..'

'दादा, अहो राज्यकारभार सोडून आपण चार महिने इथे पर्वतावर रहाणार कसे?'

'अगदी वेडा आहेस बघ तू.'

'काय झालं?'

'अरे, आपण कशाला इथे यायचं? आपल्या प्रासादात महाल काय थोडे आहेत? तिथेच त्यांना सन्मानाने घेऊन जाऊ. म्हणजे त्यांचा नित्य सहवास लाभेल.'

'माझं काही म्हणणं नाही. पण..'

'पुन्हा पण आलाच का? ते काही नाही, आपण यांना नेऊ याच! मला तर असं वाटतं की, चार महिने सुभद्रेला यांच्या सेवेत ठेवू.'

'सुभद्रेला?' दचकून कृष्णाने विचारले.

'का, दचकायला काय झालं? अरे, किती निरिच्छ आहे हा यती. सेवेने त्यांना प्रसन्न करून घेतलं तर सुभद्रेचं भावी आयुष्य सुखात जाईल.'

'दादा, आपण मोठे आहात. मी काय बोलणार...पण... नंतर काही घडलं तर मला दोष देऊ नका. नाहीतर म्हणाल, 'आधी सांगायला काय झालं होतं?'



'काही नाही. मी ठरवलं आहे, त्यात काही बदल होणार नाही. समजलास.'

चातुर्मास सुरू झाला. बलरामाने संन्याशाच्या वेषातील अर्जुनाला राजवाड्यावर आणले. एका प्रशस्त महालात त्याची व्यवस्था केली. सेवेला दास-दासी होत्याच. त्यांच्यावर लक्ष ठेवायला सुभद्राही येत असे. सुभद्रेने त्या वेषातही अर्जुनाला ओळखले. तिलाही अर्जुनाशीच

आपला विवाह व्हावा असे वाटत होते. आता तर दोघांच्या रोज गाठीभेटी होऊ लागल्या. अशा वातावरणात चातुर्मास कधी संपत आला हे कोणालाच कळले नाही.

चातुर्मास समाप्तीच्या वेळी राजपरिवारासह सर्वांनी समुद्रस्नान करायचे, देवदर्शन घ्यायचे आणि नंतर परत यायचे असा कार्यक्रम ठरला होता. कृष्णाला हे कळल्यावर त्याने अर्जुनाची एकांतात गाठ घेतली. त्याला सर्व योजना समजावून सांगितली. सुभद्रेची गाठ घेऊन तिलाही सर्व गोष्टींची कल्पना दिली. दोघांनाही आनंद झाला.

सर्वजण समुद्रस्नानाला निघाले. यती महाराजही शृंगारलेल्या रथात बसले होते. सगळेजण समुद्रकिनारी आले. स्नानाची एकच गडबड उडून गेली. सर्वांची स्नानं उरकली. वाद्यांच्या गजरात सर्वजण देवदर्शनासाठी आले. आधी यतीमहाराजांनी देवदर्शन घेतले. त्यांच्या पाठोपाठ सुभद्रेनेही देवदर्शन घेतले. सर्वांच्या आधी ते दोघे मंदिराबाहेर आले. आत दर्शनासाठी गर्दी उसळली होती. अर्जुन-सुभद्रा यांचे तिकडे लक्षही नव्हते. कृष्ण बाहेरच उभा होता. त्याने इशारा करताच अर्जुन आधीच शस्त्र सज्ज करून ठेवलेल्या रथात बसला. सुभद्रेलाही त्याने रथात घेतली आणि मेघांसारखा गडगडाट करीत, वाऱ्याच्या वेगाने रथ तेथून निघून गेला. कृष्ण साळसुदासारखा देवदर्शनासाठी मंदिरात गेला. देवदर्शन घेऊन तो बाहेर आला तेव्हा एकच गोंधळ उडाला होता. यती महाराज सुभद्रेला घेऊन पळून गेले हे सर्वांना समजले होते. बलराम रागाने लाल झाला होता. शांतपणे पुढे होऊन कृष्णाने विचारले,

'दादा, काय झालं? एवढे रागावलात का?'

'काय झालं? तुला काहीच कळलं नाही?'

'नाही. मी देवदर्शन घेत होतो. बाहेर आलो तेव्हा हा गोंधळ चाललेला. आपण रागावलेले. म्हणून...'

'कृष्णा, अरे त्या संन्याशाने सुभद्रेला पळविली.'

'दादा, तरी मी सांगत होतो की..'

'गप्प बस तू. आधी सैन्य पाठवून दोघांना पकडून आणलं पाहिजे. काही वेळाने त्यांनी अर्जुनाला गाठले. अर्जुनाने तेथून निघाल्यावर संन्याशाची वस्त्रे फेकून दिली होती. राजवस्त्रं परिधान केली होती. सैन्याने

अर्जुनाला ओळखले. त्याच्या हातातून सुभद्रेला सोडविणे कठीण होते. पण प्रयत्न करणे आवश्यक होते. शिवाय, एवढ्या सैन्यापुढे अर्जुनाचा एकट्याचा काय टिकाव लागणार, असेही त्यांना वाटत होते. युद्ध सुरू झाले आणि दिव्य अस्त्रांच्यामुळे अर्जुनाने सर्वांचा पराभव केला. राहिलेले लोक धावत पळत द्वारकेला परत आले. त्यांनी बलरामाला सगळा वृत्तांत सांगितला. कृष्णही तेथे होताच. तो संन्याशी नसून अर्जुन होता हे ऐकून बलराम आणखीनच संतापला. तो स्वतः युद्धाला जायला निघाला, तेव्हा कृष्णाने त्याची विविध प्रकारे समजूत घातली. कृष्ण म्हणाला,

'दादा, शांत व्हा. पांडव आपलेच आहेत. आपल्याच माणसांशी कशाला लढायचं? शिवाय, सुभद्रेच्या मनातूनही अर्जुनाशीच विवाह करायचा होता. अर्जुन पराक्रमी आहे. सुभद्रेच्याही मनासारखं झालंय. तेव्हा तुम्ही राग सोडावा.'

'म्हणजे, तुझंच हे कारस्थान दिसतंय.'

मंदपणे स्मित करीत कृष्ण म्हणाला,

'दादा, मलाही आत्ताच कळलं तो अर्जुन होता. नाहीतर मी तुमच्या आज्ञेबाहेर कधी तरी गेलो आहे का? पण आता झालं ते योग्यच झालं, असं मला वाटतं.'

थोड्या वेळाने बलरामाचा राग शांत झाला. त्यालाही झालेल्या गोष्टी योग्य वाटल्या. त्याने अर्जुन आणि सुभद्रेसह पांडवांना मानाने द्वारकेला बोलावले. मोठ्या थाटामाटात सुभद्रेचा विवाह अर्जुनाशी करून दिला. अनेक दास- दासी, अलंकार, सोनंनाणं, जडजवाहीर हेही सुभद्रेला दिले, सर्वांनाच प्रेमाने निरोप दिला.

हस्तिनापुरला जाण्यासाठी सुभद्रा, अर्जुन रथात बसले. कृष्ण त्या दोघांकडे पाहून मिस्किलपणे हसत होता. दोघांच्याही डोळ्यांत कृतज्ञतेचे भाव होते.

● ● ● ●

## ४. क्षण एक पुरे...

'आई ऽऽ ए आई' असे म्हणत धावतच नारायण घरी आला. धावत आल्याने त्याला दम लागला होता. डोळे पाणावले होते. अश्रू केव्हा ओघळतील सांगता येत नव्हते. चेहरा गोरामोरा झाला होता. कुणीतरी बोलल्यासारखा! रागावल्यासारखा! नारायणची आई घाबऱ्या घाबऱ्याच बाहेर आली. तिला पाहताच नारायण तिच्या कुशीत शिरला आणि मुसमुसून रडू लागला. त्या मातेचे हात त्याच्या पाठीवरून फिरत होते. ती विचारत होती, 'नारायणा, अरे रडायला काय झालं? कुणी बोललं का माझ्या बाळाला?' तरी नारायणचे हुंदके देणे चालूच होते. तिने शेवटी प्रेमळ पण त्रासिक स्वरात विचारले,

'हे रे काय? मघापासून मी विचारतेय, पण एक नाही, दोन नाही. काय समजायचं माणसानं? बोल ना, काय झालंय ते?'

आपले रडे आवरीत, हुंदके दाबीत नारायण म्हणाला, 'आई ऽऽ, माझ्या बाबांचा फडशा पाडला म्हणजे काय गं?'

'कुणी सांगितलं तुला?'

'पण आधी सांग ना, फडशा पाडला म्हणजे काय?'

'तुला कुणी सांगितलं ते सांग पाहू आधी.'

'अग, मी त्या राजपुरोहिताच्या मुलाशी खेळायला त्यांच्या अंगणात गेलो होतो ना.'

राजपुरोहितांचे नाव निघताच तिचा चेहरा बदलला. ती संतापाने थरथरू लागली आणि म्हणाली;

'मेल्या, त्यांच्याकडे जाऊ नको म्हणून हज्जारदा सांगितलं तरी ऐकत नाहीस ना? काय झालं तिथं?'

'तिथं त्याचे वडील कुणाशी तरी बोलत होते. मला अंगणात पाहताच म्हणाले, 'हा नाऱ्या आहे ना, याच्या बापाचा असाच फडा पाडला. तसाच त्या उपटसुंभाचाही पाडू म्हणजे झालं, काय? द्या टाळी.'

असं म्हणाले. आईऽऽ सांग ना, फडशा पाडला म्हणजे काय केलं? असं का केलं? आता मी कांही लहान नाही हं!'

'वा ऽ म्हणूनच आईच्या कुशीत शिरून रडत बसला होता वाटतं?'

'तसं नाही ग! पण मला त्या राजपुरोहितांचा अस्सा राग आला आहे की वाटतं त्यांना ठारच मारावं!'

त्याच्या आईने नारायणाला छातीशी कवटाळले. तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. ती भारावलेल्या आवाजात म्हणाली,

'बाळ ऽऽ, खरंच तुला त्यांचा एवढा राग आलाय? मग.. फडशा पाडणं... म्हणजे ठार मारणं... ठार मारणं.'

तिने नारायणाला पुन्हा छातीशी घट्ट धरले. नारायण म्हणाला, 'आई, माझ्या बाबांना त्यांनी ठार मारलं का? मला सांग आई. मला मोठे होऊ दे, मी त्यांना ठार मारीन. माझ्या बाबांना ठार मारता नाही का?'

'माझ्या राजा ऽऽ खरंच तू त्यांच्या मृत्यूचा सूड घेशील?'

'आईऽऽ तुझ्या गळ्या...'

'थांब काही बोलू नकोस.'

तिने त्याला बोलायचे थांबवले. त्याला मांडीवर घेतले. त्याला कुरवाळले. क्षणभर ती स्तब्ध राहिली. जणू भूतकाळ आठवत होती, शब्दबद्ध करण्यासाठी!

'बाळा, आपण पहिल्यापासून खानदेशातले. बाहाळ या गावचे. तुझे वडील येथील राजाकडे पुरोहित होते, ते ज्योतिषशास्त्र पारंगत होते. त्यांच्यासारखे प्रसिद्ध ज्योतिषी आपल्या राज्यात कोणी नव्हता. खुद्द महाराजही ज्योतिषाच्या बद्दल त्यांचाच सल्ला घेत असत. एकदा राज्यावर आक्रमण आलं. शत्रू मोठा होता. त्यावेळी महाराजांची पत्रिका पाहून यांनीच सांगितलं होतं, 'महाराज, आपले ग्रह उच्चीचे आहेत. आपला पराभव होणे शक्य नाही.' त्यांनी काढून दिलेल्या मुहूर्तावर महाराजांनी शत्रूवर हल्ला केला अन् शत्रूचा दणदणीत पराभव झाला. तेव्हापासून महाराजांचा त्यांच्यावर फार विश्वास बसला. कांही दिवसांनी महाराजांची कुंडली पाहून 'ह्यांनी' सांगितलं, 'महाराज, अत्यंत शुभ लक्षणांनी युक्त असा पुत्र आपणाला लवकरच होणार आहे त्याच्या पायाने आपल्या राज्यात समृद्धी येणार आहे; आणि खरोखरच त्याप्रमाणे

घडले. मग काय, यांच्या सल्ल्यावाचून महाराजांचं पानहीं हलेना! आणि हे पाहून साहजिकच इतर ज्योतिर्विदांच्या मनातील मत्सर वाढू लागला. राजसभेत यांना घालून पाडून बोलू लागले. त्यांचा अपमान होईल असे बोलू लागले. पण दुसऱ्याचा मत्सर करून, अपमान करून आपली प्रतिष्ठा वाढत नसते. प्रतिष्ठा वाढवायला अंगात कर्तृत्व असावे लागते. पण त्यांना हे समजायला हवे ना?'

एक दिवस दरबार भरला होता. इतर ज्योतिर्षींही तुझ्या बाबांच्याबरोबर उपस्थित होते. महाराज आले. इतर काहीं चर्चेनंतर तुझे वडील म्हणाले,

'ज्योतिर्विदहो, आज मी तुम्हाला एक आव्हान देणार आहे.'

'आम्हाला आव्हान? आणि ते कोणते बुवा?'

'तुम्ही सगळेजण स्वतःला ज्योतिषी म्हणवताना?'

'मग, खोटे काय आहे त्यात? तुम्हाला शंका का आली?'

'शंका वगैरे काहीं आली नाही. पण जो मेणाची मेख खडकामध्ये गाडून दाखवील तो खरा ज्योतिषी! इतर सारे ज्योतिषी व्यर्थ होत.'

'वा ऽऽ! काय पण आव्हान आहे? तोंडाची वाफ काय कोणींही दवडील. हे कधी कोणी ऐकलं तरी आहे का?' एक ज्योतिषी.

'अहो महाशय, आमच्या ज्योतिषाचं जाऊ द्या पण तुम्ही तर खरे, पूर्ण ज्योतिषी आहात ना?' —दुसरा.

'आहात म्हणजे काय? आणि त्याचा मला सार्थ अभिमानही आहे.'

'मग, तुम्हींच का नाहीं हा प्रयोग करून दाखवीत? तुमच्या ज्योतिषाचे कसब आम्हाला तरी पाहता येईल.'

असं म्हणून सगळेजण कुत्सितपणे हसले. त्यांच्या त्या हसण्यातला अर्थ तुझ्या बाबांना समजला आणि ते म्हणाले,

'अवश्य, मी करून दाखवीन हा प्रयोग.'

'पण, जर तुम्हीं हारलात तर आम्हीं सांगू ती शिक्षा घ्यायला तयार झालं पाहिजे. आहे तयारी?'

'हो. तुम्हीं सांगाल ती शिक्षा घेईन. सांगा मी हरलो तर काय शिक्षा घेऊ?'

'त्यांचा अतिमत्सर करणारा सध्याचा राजपुरोहित आहे ना?'

'म्हणजे आई मी आता ज्यांच्याकडे गेलो होतो तेच ना ?' नारायणने विचारले.

'हो तोच.' तो म्हणाला मृत्युदंडाची! तुम्ही जर हरलात तर महाराज तुमचा वध करतील. आहे तयारी?'

'ठीक आहे.'

'सर्वांच्या देखत प्रतिज्ञा करून तुझ्या वडिलांनी ठरलेल्या दिवशी तो प्रयोग सुरू केला. मेणाची मेख केली. ती खडकावर धरली. ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करून मुहूर्त शोधून काढलेला होता. तो क्षण अचूक साधायचा होता. राजसेवकाच्या हातात दांडके दिले आणि त्याला त्यांनी सांगितले, 'हं' म्हणताच ते दांडके त्या मेखेवर हाणायचे. सर्व तयारी झाल्यावर या मत्सरी पुरोहिताने राजसेवकाला नेत्रसंकेत केला.त्याला लाच देऊ केली. तोही भाळला, आणि त्याने त्या मुहूर्ताच्या क्षणाला दांडके मेखेवर मारले नाही. झालं मेख खडकात गाडली गेली नाही. तिचा थापटा झाला. ठरल्याप्रमाणे पुरोहिताने राजाच्या मागे लागून तुझ्या पित्याचा वध करविला. ठरवून या दुष्ट लोकांनी त्यांना मारलं.'

नारायणाला आईकडून ही हकीगत कळल्यावर त्याला फार दु:ख झाले. पण त्याने आपल्या वडिलांच्या मृत्यूचा सूड घ्यायचा ठरविले. त्यावेळी त्याचे वय होते बारा वर्षांचे! तो ज्योतिषाच्या अभ्यासाला लागला. बंगाली विद्या, तंत्रमंत्र हे सारे शिकू लागला. मुळात हुशार असल्याने त्याने या सर्व विद्या चांगल्या तऱ्हेने आत्मसात केल्या. तो महापंडित झाला. राजाला त्याच्या वडिलांचे कर्तृत्व माहिती असल्यामुळे आणि शिवाय याचे पांडित्य निदर्शनास आल्याने राजाश्रय तर मिळालाच पण काही दिवसातच राजाची मर्जीही!

नारायण योग्य संधीची वाट पहात होता. एके दिवा राजसभेत सगळे बसले असताना तो म्हणाला, 'आजपासून बाराव्या दिवशी अमावास्या आहे. माध्यान्हीला समुद्र फुटेल आणि प्रलय होईल. सर्वजण बुडतील. आपले हे भविष्य खोटे ठरले तर वडिलांची जी गत केली ती आपली करावी.'

हे ऐकून जुन्या पुरोहिताला आनंद झाला. कारण अलीकडे नारायण आल्यापासून , त्याच्या बुद्धिमत्तेने राजा दिपून गेल्यामुळे याचे प्रस्थ कमी होऊ लागले होते.

‘वत्सा, फार आनंदात दिसतोस. कारण मला माहीत आहे. पण बेटा, हा आनंद क्षणभंगूर आहे.’

‘म्हणजे, आपण काय बोलता आहात ?’

‘योग्य तेच बोलतो आहे.’

‘आपल्याला कसं कळलं ?’

‘परमेश्वरकृपेने ! बेटा, सूडाचे समाधान फार काळ टिकत नसते. जीवनाचे सार्थक जीव घेण्यात नाही. जीवाला जीवन देण्यात आहे. परमेश्वरस्वरूप समजावून घेऊन मुक्ती मिळविण्यात आहे.’

त्याचे ते अमृताचा वर्षाव करणारे शब्द आणि दिव्य विभूतिमत्त्व पाहून नारायण बदलला. एकदम बदलला. एका क्षणात त्याच्या मनावरची अविचाराची पुटे निघून गेली. त्याला आपल्या जीवितकार्याची ओळख पटली. विचाराची ज्योत पेटली. विकारांचा अंधार नाहीसा झाला. आणि त्याचक्षणी त्याने त्या दिव्य विभूतीच्या चरणावर मस्तक ठेवले. अश्रूंनी त्यांचे पाय न्हाऊन काढले, आणि त्या व्यक्तीनेही आपला कृपाहस्त त्याच्या डोक्यावर ठेवला.

ती दिव्य व्यक्ती होती अचल मालोबास ! महानुभाव पंथाचे एक थोर उपासक. आणि नारायण. म्हणजे पुढे प्रसिद्धीस आलेला श्रेष्ठ महानुभाव कवी नारोव्यास ! यांचे ‘ऋद्धिपुरवर्णन’ हे काव्य प्रसिद्ध असून, महानुभावांच्या ‘साती’ ह्या पवित्र ग्रंथात त्याला स्थान मिळाले आहे.

● ● ● ●

3004

अमावास्येचा दिवस उजाडला. सर्वजण चिंताक्रांत झाले. राजाने सर्वांना योग्य त्या सूचना दिल्या होत्याच. माध्यान्ह झाली. नारायणाने विधिपूर्वक मंत्रजप केला. त्याबरोबर मोठा पूर आला. गांव बुडू लागले. राजा सर्वांना घेऊन एका उंच दुर्गावर आला. तेथेही पाणी चढू लागले. सर्वच घाबरले. त्याहीपेक्षा उंच दुर्गावर पोहून जाण्याचा विचार पक्का झाला. त्यात तो जुना राजपुरोहित होताच. त्याने पाण्यात उडी मारली. राजाही उडी टाकू लागला पण नारायणाने त्याला थांबवले. तो पुरोहित पाण्यात बुडुन मृत्यू पावला. हे पाहताच नारायणाने पुन्हा मंत्र जपून पूर्ववत स्थिती निर्माण केली. संकट टळले म्हणून राजा आनंदला आणि आपल्या वडिलांच्या मृत्यूचा सूड घेतला म्हणून नारायण ! !



नारायणाचा आनंद गगनात मावत नव्हता. आज त्याला कृतकृत्य झाल्यासारखे वाटत होते. ही आनंदाची वार्ता आईला केव्हा सांगतो, असे त्याला झाले होते. रस्त्याने जात होतो का हवेतून हे त्याचे त्यालाही उमगत नव्हते. घर जवळ आले; आणि एवढ्यात एक तेजःपुंज व्यक्ती त्याच्यासमोर उभी राहिली. त्या तेजाने नारायण दिपून गेला. नकळत त्याचे हृदय नम्र झाले. त्या व्यक्तीने त्यांना विचारले,

'वत्सा, फार आनंदात दिसतोस. कारण मला माहीत आहे. पण बेटा, हा आनंद क्षणभंगूर आहे.'

'म्हणजे, आपण काय बोलता आहात?'

'योग्य तेच बोलतो आहे.'

'आपल्याला कसं कळलं?'

'परमेश्वरकृपेने! बेटा, सूडाचे समाधान फार काळ टिकत नसते. जीवनाचे सार्थक जीव घेण्यात नाहीं. जीवाला जीवन देण्यात आहे. परमेश्वरस्वरूप समजावून घेऊन मुक्ती मिळविण्यात आहे.'

त्याचे ते अमृताचा वर्षाव करणारे शब्द आणि दिव्य विभूतिमत्त्व पाहून नारायण बदलला. एकदम बदलला. एका क्षणात त्याच्या मनावरचीं अविचाराची पुटे निघून गेलीं. त्याला आपल्या जीवितकार्याचीं ओळख पटली. विचाराची ज्योत पेटली. विकारांचा अंधार नाहीसा झाला. आणि त्याचक्षणी त्याने त्या दिव्य विभूतींच्या चरणावर मस्तक ठेवले. अश्रूंनी त्यांचे पाय न्हाऊन काढले, आणि त्या व्यक्तीनेही आपला कृपाहस्त त्याच्या डोक्यावर ठेवला.

ती दिव्य व्यक्ती होती अचल मालोबास! महानुभाव पंथाचे एक थोर उपासक. आणि नारायण. म्हणजे पुढे प्रसिद्धीस आलेला श्रेष्ठ महानुभाव कवी नारोव्यास! यांचे 'ऋद्धिपुरवर्णन' हे काव्य प्रसिद्ध असून, महानुभावांच्या 'साती' ह्या पवित्र ग्रंथात त्याला स्थान मिळाले आहे.

● ● ● ●

3004

# ५. सात वेडे वीर

महाराजांच्याकडून आलेल्या थैलींचे बंद प्रतापरावांनी सरकविले. मोठ्या अपेक्षेने नि आनंदाने खलिता हातात घेतला. बहलोलखानावर मिळविलेल्या विजयाने महाराज प्रसन्न झाले असतील. त्यांनी कौतुकाचे चार शब्द लिहिले असतील. त्या लाख मोलाच्या शब्दांसाठी प्रतापराव आसुसले होते. अधीरतेने त्यांनी पत्र वाचायला सुरुवात केली. त्यांची नजर ओळींवरून सरकू लागली नि चेहरा बदलू लागला. आनंदाची जागा दुःख, पश्चात्ताप, सूड, संताप अशा अनेक भावनांनी घेतली. त्या डोक्यात थैमान घालू लागल्या. त्यांची दृष्टी पत्रातील काही भागावर पुन्हा खिळली.

' तुम्हीं नको त्या ठिकाणी दया दाखविली. बहलोलखानाला गिरफदार करून हुजुरादाखल करण्याऐवजी त्याला धर्मवाट दिली. प्रतापराव ! स्वतःला मराठा दौलतींचे सरनौबत म्हणविता, पण तुम्हास राजकारण समजत नाही. तुम्हीं केवळ शिपाईगिरीच केलीत. आमची आज्ञा मानिली नाहीं. आता तो पठाण सापासारखा उलटला आहे. दौलतीची खराबी करतो आहे. ऐस्या बातम्या आम्हांस समजतात, तरी आता तुम्हापासीं असणारे कुल लष्कर घेवोन खानास बुडवून फत्ते करणे, नाहीतर याउपरी आम्हांस तोंड न दाखविणे हीं आमची आज्ञा आहे. ''

' बहलोलखानास बुडविल्याशिवाय आम्हांस तोंड न दाखविणे. '' हीं महाराजांची आज्ञा! म्हणजे, महाराजांचा राग अजून शांत झाला नव्हता तर! पूर्वी इतकाच तो होता.

गेल्या आठ- दहा महिन्यांत महाराजांचं प्रसन्न दर्शन झालं नव्हतं. आता आज्ञापालन होईपर्यंत होणं शक्यही नव्हतं. महाराजांचं दर्शन! विचार मनात येताच मन भूतकाळात गेलं, दहा महिन्यांपूर्वीच्या!

दहा महिन्यांपूर्वी पन्हाळा स्वराज्यात आला. किती भाग्याचा दिवस होता तो! महाराजांच्या आज्ञेने आम्हीं पन्हाळ्यावर दाखल झालो होतो.

गडावर आनंदी आनंद होता. सर्वत्र आनंदोत्सव साजरा केला जात होता.

याच वेळी विजापूर दरबारात मात्र हाहाकार उडाला होता. सगळे सरदार दात- ओठ खात होते. बहलोलखानाच्या जहागिरीतील किल्ला घेतल्याने तो तर अधिकच खवळला होता. 'महाराजांना खाऊ का गिळू' असे त्याला झाले होते. तथापि त्याला हे समजत नव्हते की, 'शत्रूवर केवळ दातओठ खाऊन विचय मिळविता येत नसतो.'

महाराजांचा बीमोड केलाच पाहिजे या भावनेने विजापूरकरांनी बहलोलखानाला मोहीम मुकर्रर करायला सांगितली. त्यालाही तेच पाहिजे होते. त्याने तयारी केली. फौजांना हुकूम सुटले. बारा हजार फौजेनिशी तो विजापूरहून निघाला. रस्त्यात अनेक सरदार त्याला मिळणार होते. सैनिकांचा बिंदू बिंदू त्याच्या सैन्याला मिळून मोठा सैन्यसिंधू तयार होणार होता.

आमच्या हेरांनी ही बातमी अचूक टिपली. तो दौडत-दौडत पन्हाळ्याला आला. महाराजांना बातमी मिळाली.

रात्र झाली. महाराजांनी मसलतीकरिता साऱ्यांना बोलावले. ही मसलत अगदी गुप्त होती. ठराविक लोकांच्याशिवाय कोणालाच काहीही कळणार नव्हते. अगदी पन्हाळ्याच्या दगडांनासुद्धा! महाराजांची ही नेहमीचीच रीत होती. शत्रूच्या सगळ्या बातम्या बिनचूक आपल्या हाती आल्या पाहिजेत; पण आपल्याकडची छोटीशी बातमीसुद्धा त्याला शेवटपर्यंत समजता कामा नये. युद्धाचं यशापयश आपले डावपेच किती गुप्त राहतात, यावर अवलंबून असते.

महाराजांनी सारी परिस्थिती निवेदन केली; आणि विचारले—

'खासा बहलोल आपणावर येत आहे. आपण काय उपाय करावा?'

आम्ही सांगितले,

'महाराज, आपण कामगिरी सांगावी. फत्ते करून हुजुरांचे पायासी मुजऱ्यास येऊ.'

'पठाणाची ताकद अजून कमी आहे. त्याला कल्पना यायचे आधी त्यावर हल्ला करावा. पकडून आमचेकडे आणावा नाहीतर साफ बुडवावा.'

'महाराजांची मसलत मला पटली. शत्रूची ताकद कमी असताना त्याच्यावर चढाई केली तरच विजय मिळविता येतो.

थोड्याच वेळात महाराज म्हणाले,

‘प्रतापराव, तुम्ही दौलतीचे सरनौबत. तुम्हास कामगिरी सांगतो. पठाण स्वराज्य बुडवू पाहात आहे. त्यास मारोन यावे. नाहीतर आमच्यापासी धरोन आणावे.’

मी महाराजांना मुजरा केला. बाकीच्यांनीही मुजरे केले. सगळे स्वस्थानी गेले. मी लगेच मोहिमेची तयारी केली. विठ्ठल अत्रे, कृष्णाजी भास्कर, सिद्दी हिलाल, विठोजी शिंदे असे कितीतरी जिवाचे जिवलग सांगाती घेतले. सगळ्यांना सकाळीच निघण्याच्या दृष्टीने योग्य त्या सूचना दिल्या.

सकाळीच महाराजांना मुजरा करून मी पन्हाळ्यावरून निघालो. योजना सगळी तयार होती. पठाण उमराणीजवळ आला होता. तेथेच त्याच्याशी चार हात करून त्याला नेस्तनाबूत करायचा होता. आम्ही सारे उमराणीच्या रोखाने दौडत होतो.

पठाणापेक्षा आमचे बळ कितीतरी अधिक होते. आमच्यापाशी पंधराहजार सैन्य होते; आणि तेही बाजार - बुणग्यांचे सैन्य नव्हते. स्वराज्याकरिता सर्वस्वाचे दान करायला तयार असणाऱ्या जिवंत मनाचे सैन्य होते. सैन्याचं बळ संख्येत नसते. त्यांच्या हातात असणाऱ्या अद्ययावत शस्त्रावर, त्यापाठी मागे असणाऱ्या जिवंत व खंबीर मनावर, मनाच्या निर्धारावर आणि विजिगीषू ईर्षेवर ते अवलंबून असते.

दोनच दिवसांत आम्ही उमराणी गाठली. अगदी बिनबोभाट! खानाला याचा पत्ताही नव्हता. त्याला कळायच्या आतच त्याच्यावर आमची मावळी झडप पडणार होती. खानाची नाकेबंदी करून त्याचा बीमोड करायचा होता.

मला उमराणीची खडान्‌खडा माहिती मिळाली होती. खानाला मोकळ्या मैदानात जिंकायचे होते. त्याचे सैनिकही कडवे होते, ही गोष्ट नाकारून चालणार नव्हती. युद्धाच्या आधी शत्रूच्या ताकदीचाही योग्य तो आदमास यावा लागतो. शिवाय खानाच्या परगण्यातील किल्ला घेतल्याने तो चिडला होता. तेव्हा त्याच्याशी लढताना अविचार करून चालणार नव्हते. आम्हाला विजयी व्हायचे होते. विजय मिळविण्याकरिता आधी लागते बिनचूक योजना आणि नंतर असावा लागतो पराक्रम! अविचाराने कोणालाच विजय प्राप्त होत नसतो. आमची योजना तयार होती.

उन्हाळ्याचे दिवस होते. ग्रीष्म कृतांतासारखा थैमान घालीत होता. अंगाची लाही लाही होत होती. अशा स्थितीत खानाला पाण्याची नितान्त गरज होती. त्याला पाणी पुरविणारा एकच मोठा जलाशय होता आणि तो म्हणजे डोण नदीचा मोठा डोह. ते पाणीच जर बंद केले, तर त्याला पाणी पाजायला मुळीच वेळ लागणार नव्हता.

मी सिद्दी हिलालला पाणवठा ताब्यात घेण्यास फर्माविले. त्यात अवघड असे काहीच नव्हते, कारण जलाशयावर खानाचे पहारे नव्हते. आमचे पहारे तेथे बसले. पाणवठा आमच्या ताब्यात आला.

बाकीच्या सरदारांना खानाच्या छावणीस दूरवरून गुपचूप वेढा घालण्यास सांगितले. माझ्याजवळ एक हजार फौज ठेवली. इशारा होताच; सगळ्यांनी एकदम खानावर तुटून पडायचे असे ठरले.

दुपारच्या वेळी खानाच्या सैन्यास पाण्याची निकड भासली. काही स्वार पाणवठ्यावर आले; आणि हादरलेच. सगळीकडे मराठ्यांचे पहारे! अंगाला दरदरून घाम सुटला. ते तसेच पळाले. खानाकडे आले. घाबऱ्या घाबऱ्या खानाला जेमतेम बातमी दिली 'शत्रू आला...'

एवढ्यात ... खरंच शत्रू आला.

खानाला स्वत:ला सावरायला वेळ मिळायच्या आतच मी सैन्यासह खानावर तुटून पडलो. भयंकर रणकंदन सुरू होणार होते त्याची ही नांदी! आमचा, त्याच्यावर चालून जाण्याचा, आवेश असा काही विलक्षण होता की, खानाच्या तोंडचे पाणीच पळाले. मला समोर पाहताच तो घाबरला; तरीही क्षणातच त्याने स्वत:ला सावरले. सैन्यास आज्ञा केली. एकच धावपळ उडाली. तातडीने त्याचे सैन्य तयार झाले

युद्धाला तोंड लागले. भयंकर युद्ध सुरू झाले. बाणांचावर्षाव होऊ लागला. तलवारीची खणाखणी सुरू झाली. एक घटका, दोन घटका... तीन घटका उलटल्या. युद्ध चालूच होते. मराठ्यांच्या तलवारीचे जळजळीत पाणी पठाणांना मिळत होते. पण पिण्याला मात्र पाण्याचा थेंबही मिळत नव्हता. खानाचे हत्ती, घोडे, सैनिक सगळे तहानेने व्याकुळ झाले होते. पाण्याकरिता तडफडू लागले होते, तरीही पाणी मिळणे शक्यच नव्हते. माझ्या सैन्याचे पाणवठ्याची कामगिरी उत्तम पार पाडली होती.

खान आम्हांला पिटाळण्याची शिकस्त करीत होता. त्याला हे जमणे अशक्य होते. याची मला खात्री होती. आत्मविश्वास होता. मी

माझ्या सैनिकांना उत्साह देत होतो. नवचैतन्य त्यांच्या अंगात निर्माण करीत होतो. तेंही प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. या सगळ्याचा योग्य तो परिणाम होत होता. थोड्याच वेळात खानाला शरण यावे लागणार अशी चिन्हे दिसू लागलीं.

काहीं वेळाने तेच घडले. खानाला कळले, 'मराठ्यांनी पाणवठा अडविल्याने आपले सैनिक हतबल झाले आहेत. "भोवतालीं सगळ्या बाजूंनी मराठे प्राण घ्यायला टपून बसले आहेत. पळून जाता येणेहीं अशक्य झाले आहे. आता काय करायचे? खानाला काहीं सुचेना. त्याचा चेहरा त्याच्या अगतिकतेची ग्वाही देऊ लागला.

थोड्याच वेळातच खानाने त्याचा दूत माझ्याकडे पाठविला. खानाचा पराभव झाला. त्याला भुईसपाट केला. मिजास एका सपाट्यात उतरविली. खानाच्या दूताने माझ्याकडे विनवणी केलीं. अगदी दीनवाणे होऊन खानाने कळविले होते –

'पातशहाचे हुकमाने आम्हीं तुमच्यावर चाल केलीं. पण आपली ताकद बहुत आहे. ते आम्हांस कळोन चुकले आहे. आता पुन्हा तुमच्यावर चाल करणार नाही. महाराजांशीं दावा करणार नाही. हे वेळीं आम्हांस सोडोन द्यावे. दया दाखवावी. आम्हीं तुमचे उपकार जन्मभर उराशीं वागवू.'

खानाची विनंती, आर्जच ऐकून मला खानाची दया आली. एवढ्या उन्मत्त माणसाला मीं वाकविलं होतं. त्याला जन्माचीं अद्दल घडविली होतीं. स्वराज्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याचा परिणाम काय होतो, हे त्याला दाखवून दिले होते. त्याचा संपूर्ण पराभव केला होता. शिवाय त्याचे दोन हत्तींही आम्ही युद्धात जिंकले होते. मला वाटलं आता खानाला एवढी शिक्षा पुरे आहे.

मीं खानावर दया केली. त्याला जाण्याला वाट करून दिलीं. खालच्या मानेने खान माझ्यापुढून निघून गेला. विजयाचीं बातमी पन्हाळ्याच्या दिशेने दौडलीं. आम्हीं आनंदात मग्न होऊन तेथेच तळ दिला.

विजयाची धुंदी काही और असते. विजयीं झाल्याशिवाय तीं कळत नाहीं. विजयाने आत्मविश्वास वाढतो. आत्मिक बळ दुणावतं.

मीं मनाशींच पुढचे संकल्प तयार करीत होतो. मुलुखगिरी कशी

आणि कुठे करायचीं याची योजना होत होती. महाराजही संतुष्ट होतील अशी माझी कल्पना होती. मी त्यांच्या पुढच्या आज्ञेची वाट पाहात होतो.

एक- दोन दिवसांतच महाराजांची थैली आली. आनंदाने मी ती उघडली आणि चपापलो. मी समजत होतो, महाराज संतुष्ट होतील पण ते नाराज झाले होते; रागावले होते. माझी चढलेली धुंदी खाडकन् उतरली. त्या पत्रातून मला त्यांची संतप्त मुद्रा दिसू लागली. ते प्रश्न विचारीत आहेत, असा मला भास झाला—

'सरनौबत! सला काय म्हणून केला? कोणी आज्ञा केली होती? कोणास पुसून आपण खानास सोडले? हुजुरादाखल का केले नाही? आता तो साप स्वराज्यावर उलटेल, रयतेला पीडा देईल. राज्याची बरबादी होईल. आता याला जबाबदार कोण?'

उकळत्या तेलाप्रमाणे महाराजांचे ते शब्द माझ्याकानात घुसले. त्यांचे शब्द माझ्या कानात घुमू लागले. आता काय करावं माझ्यापुढं प्रश्न पडला. मला पश्चात्ताप झाला; पण आता काय उपयोग?

मी लगेच ठरविले बहलोलला परत जिंकायचा किंवा ठार करायचा. त्याप्रमाणे प्रयत्नालाही लागलो. पण तशी संधीच मिळेना. महाराजांचे शब्द मात्र खरे ठरत होते. बहलोलखान उपकार विसरला होता. त्याच्यावर दाखविलेली दया फुकट गेली होती. शत्रू अखेर 'शत्रूच' ठरला होता. सापाला कितीही दूध पाजलं तरी तो विषयच ओकतो. अमृत नाही.

याचा प्रत्यय मला पुन्हा एकदा आला होता. मी बहलोलवर उपकार केला होता; पण त्याच्या मनाला अपमान झोंबत असावा. काळजात सूड धगधगत असावा. कारण तो त्याच प्रांतात स्वराज्याची खराबी करीत हिंडत होता.

आज त्या गोष्टीला आठ-दहा महिने होऊन गेले होते. बहलोल अजून हाती लागत नव्हता. तोंडातून गेलेला शब्द आणि हातातून निसटलेला शत्रू परत सापडत नसतो. हे तत्त्व मला आता उमगले होते. पण फार उशिरा!!

या अस्वस्थ अवस्थेत मी बादशाही मुलूख लुटीत होतो. संपत्तीचा ओघ स्वराज्याकडे सारखा वहात होता. तरी माझे समाधान होत नव्हते. जीवाची सारखी तगमग चालली होती. कधी कधी स्वप्नातसुद्धा रागावलेले

महाराज दिसत. ‘सला काय म्हणून केला?’ हा सवाल ऐकून मी दचकून जागा होत असे. बहलोल म्हटले की माझे डोळे संतापाने लाल होत; मुठी आवळल्या जात; परंतु तूर्त काहीं उपयोग नव्हता.

आमचा तळ गडहिंग्लजजवळ होता. मुलुखगिरी चालूच होतीं. त्यातच महाराजांचे हे पत्र मिळाले होते. ‘बहलोलला बुडविल्या विना आम्हांस तोंड न दाखविणे.’ महाराज किती कठोर बनले होते? त्यांचं दर्शन होणं आता कठीण होतं. मी दुःखी झालो. निराश झालो. अस्वस्थतेतच सारा दिवस गेला.

मीं बहलोलला बुडवायची घाई करीत होतो. कारण रायगडावरच्या महाराजांच्या राज्याभिषेकाच्या बातम्या सारख्या येत होत्या. महाराजहीं तेथेच होते. मराठ्यांच्या राजाचा राज्याभिषेक! युगानुयुगे जे स्वप्न उराशीं जपले होते, त्याची पूर्ती! अनाथ मराठी रयतेला सनाथ करणारा दिवस!! अशा मंगल प्रसंगी खानाला नेस्तनाबूत केल्याशिवाय मी तेथे कसा जाऊ? रायगड माझं स्वागत करील का? महाराज मला आपुलकीनं जवळ करतील का?

छे; शक्य नाही. माझ्या राजाचा राज्याभिषेक मला पाहता येणार नाहीं. एकट्या मला! किती मोठं शल्य होतं हे? ह्रदय रक्तबंबाळ करणारी गोष्ट होती ही. रणात मी तलवारीचे वार थाडथाड छाताडावर झेलले असते. त्यांच्या जखमा मला सुसह्य झाल्या असत्या त्यात आनंद वाटला असता. पण ही मुकी वेदना मला सहन करता येत नव्हती. दुसऱ्या कोणाच्याहीं रागाची मी पर्वा केली नसती; पण माझ्या राजाचा राग मला असह्य होत होता. त्यांच्या शब्दांनी मी विद्ध हरिणासारखा घायाळ झालो होतो. सैरावैरा धावत होतो. पळत होतो. मार्ग सापडत नव्हता. काय करावं हे सुचत नव्हतं.

दोन दिवस निघून गेले. तिसऱ्या दिवशी मी माझ्या दोस्तांना बरोबर घेतलं आणि छावणीतून भटकत भटकत दूर गेलो. थंडीचे दिवस होते. कडाक्याची थंडी होती. शरीर काकडत होतं आणि मनहीं! आम्ही दौडत होतो. छावणी खूप दूर राहिली होती. आम्ही सात जण होतो. थोड्या वेळाने विश्रांतीकरता एका देवालयाचा आसरा घेतला.

लगेच मनात विचार भिरभिरू लागले. बहलोलखान...मोकळं मन स्वस्थ बसत नाही. विचारांचं थैमान त्यात सुरू होतं.

एवढ्यात माझं लक्ष समोर गेलं. एक स्वार दौडत येताना दिसला. पेहरावावरून मराठा दूत असवा असं वाटलं. तो जवळ येताच अनेक विचार तरंग मनात येऊन गेले.

दूत घोड्यावरून खाली उतरला. धापा टाकीतच तो माझ्याजवळ आला. मुजराक करून मला म्हणाला, "बहलोलखान नेसरीच्या रोखाने येतं आहे. बरोबर प्रचंड फौज आहे."

त्याने निरोप सांगितला मात्र; त्याचं नाव काढताच मी संतापानं लाल झालो. बहलोल! ज्याला स्वतःच्या सामर्थ्याने जिंकून घेतलं तो! माझ्यासमोर, मी दिलेल्या धर्मवाटेने मान खाली घालून निघून गेलेला तो! केलेले उपकार विसरलेला! दिलेला शब्द मोडणारा नीच! स्वराज्य बुडवायला निघालेला निमकहराम! कृतघ्न!!

याचा मोड केलाच पाहिजे. महाराज्यांच्या जीवास शांतता मिळणार नाही. रायगडचे दरवाजे मला उघडे राहणार नाहीत. त्याला नेस्तनाबूत केलाच पाहिजे.

मी देहभान विसरलो.

सूडाने पेटलेलं माझं मन कोणताही विचार करायला तयार होईना. डोळ्यांसमोर दिसत होता फक्त बहोलोलखान! आणि कानात घुमत होती महाराजांची आज्ञा. "नाहीतर आम्हांस तोंड न दाखविणे."

छावणी दूर आहे, आम्ही केवळ सातच जण आहोत, याचाही विचार माझ्या मनात आला नाही. विचार करण्याच्या मनःस्थितीत मी नव्हतोच.

खानावर चालून जायचे तर सैन्य घेऊन जावे, एवढा साधा विचारसुद्धा माझ्या मनाला शिवला नाही. मी त्याच्यावर चढाई करण्याचे ठरविले.हा निव्वळ अविचार होता. पण हे शेवटच्या क्षणापर्यंत मला कळले नाही. त्या वेळेला उपयोग नव्हता. सारे संपत आले होते.

मी घोड्यावर स्वार झालो. माझ्याबरोबर माझे सहा सहकारी होते. महाराजांची आज्ञापालन करण्याकरीता काय वाटेल ते करायचे पण माघारी फिरायचे नाही असं मनाशी ठरविलं होतं. आमचे घोडे बेफाम वेगाने धावत सुटले. वाऱ्याशी स्पर्धा करू लागले. तो देखील आमचा वेग पाहून चकित झाला असावा. नेसरीच्या रोखाने आम्ही जीव खाऊन दौडत होतो. हातात होत्या नंग्या तलवारी! बहलोलखानाच्या

रक्ताकरिता तहानेलेल्या! पश्चात्तापाचा कलंक पुसण्याकरता आसुसलेल्या! महाराजांची आज्ञा पालन करण्याकरिता उतावीळ झालेल्या!!

घोडे अंतर कापीत होते. धुराळा उडत होता. खानाचे सैन्य दिसायला लागल्यावर आमचा वेग आणखीनच वाढला. खानाच्या सैन्यात शिरायला मी उत्सुक झालो होतो. त्याचे सैन्य प्रचंड होते. नेसरींची खिंड ओलांडण्याचा तो प्रयत्न करीत होता.

खान अधिक स्पष्ट दिसू लागला.

माझा संताप आणि चीड आणखी वाढली.

दोघांतले अंतर खूप कमी झाले.

माझा त्वेष जास्तच वाढला.

माझे सामर्थ्य खूपच आहे, याची मला जाणीव झाली. क्षणभर खानाचे सैन्य पाहिले आणि शंका येते न येते तोच मनाने सांगितले 'शंका कसली घेतोस? आगीची ठिणगी लहान असते, तरीही ती गवताची गंज जाळून भस्म करते. खानाचे सैन्य गवतासारखे जाळून टाक. खानाला तलवारीच्या एकाच फटकाऱ्याने मारून टाक. महाराजांची आज्ञा पालन कर आणि असाच दौडंत दौडत त्यांना मुजरा करायला जा.'

अंतर कमी झाले. काही पावलांचेच राहिले.


इतका वेळ खानाला पत्ताच नव्हता. ही झडप अचानक होती. ही झेप अनपेक्षित होती. खानाने डोळे फाडून पाहिले. रोखून रोखून पाहिले. मी प्रतापराव असल्याची त्याची खात्री झाली.

त्याला काय वाटले हे काय सांगू? पण त्याच्या डोळ्यांत आनंदाची चमक होती. मिस्किल हास्याची छटा होती. त्याने विचार केला असेल, 'हाच प्रतापराव नाही का? माझा अपमान करणारा? पराभव करणारा? आता? आता काय कराल? ए अल्ला! परवरदिगार, कैसा मौका तूने दिया है आज! ऐसी घडी मैने सपनेमेंभी नहीं देखी थी!'

मला थांबायला वेळ नव्हता. मी आत घुसलो. माझे सवंगडी तितक्याच वेगाने आत घुसले. विजेच्या लोळाप्रमाणे! भयंकर कापाकापी सुरू झाली. आमच्या अंगात प्रलयंकार रुद्राचे बळ संचारले होते. सगळ्या सैन्यात आमचे तांडव नृत्य सुरू होते. आम्ही फक्त सातजण होतो. आणि ते? ते अगणित. वारावर वार पडत होते. अनेक लोक ठार होत होते. युद्ध तुंबळ सुरू झाले होते; जणू आषाढ घनांशी वादळी

वारा झुंजत होता.

सगळ्या सैनिकांचे वार आम्हा सातजणांवर पडत होते. एक एक सहकारी प्रचंड पराक्रम करून धरतीवर कोसळू लागला. वादळी वाऱ्याने खवळलेल्या समुद्रात, छोट्या होड्यांची जी गत होते, ती आमची झाली होती.



मी प्राणपणाने लढत होतो. आज्ञापालनाचा अखेरचा, निकराचा प्रयत्न करीत होतो. मी अनेकांना लोळवलं. प्रत्यक्ष बहलोलच्या हत्तीपर्यंत मी पोहोचलो. फक्त दोन क्षणांचा अवधी हवा होता. घोड्याने हत्तीच्या अंगावर पाय रोवले. आता मी बहलोलवर वार करणार, त्याला ठार करणार, आज्ञापालन करणार तोच...तोच, माझ्या वर्मी घाव बसला. जिव्हारी घाव बसला. मी खाली कोसळलो. बहलोल सुटला. पुन्हा एकदा निसटला. माझ्या डोळ्यांपुढे तो दिसत असताना मी उठू शकत नव्हतो. डोळ्यांसमोरून जात असतानासुद्धा मी काही करू शकत नव्हतो.

डोळ्यांपुढे अंधारी येत चालली. कोणाचेतरी आवाज कानात घुमू

लागले— 'बहलोलला मार... फत्ते करून ये....' आवाज ओळखू येत नव्हता. बहुधा महाराजांचा असावा.

डोळ्यांपुढचा अंधार वाढत होता. मी मनातल्या मनात महाराजांना मुजरा केला. शब्द तोंडातल्या तोंडात घोटाळू लागले, 'महाराज... आपल्या... आज्ञेचे पालन... करण्याचा आटोकाट... प्रयत्न केला. सर्वस्वाचा त्याग करायला सिद्ध झालो. बहलोलच्या अगदी जवळ जाऊन त्याला मारायचा... प्रयत्न केला; पण.. आपली... आज्ञा...'

डोळ्यांपुढचा अंधार खूप वाढला. काहीं ऐकू येईनासे झाले. शब्द ओठातच अडले. अंधार आणखी वाढला. आणि पुढं काय झालं हे मला कळलंच नाहीं.

••••.

# ६. ध्येयाचा ध्रुवतारा

तिन्हीसांजा झाल्या होत्या. अंधार पडू लागला होता. सरस्वतीबाई उठल्या. देवाजवळ दिवा लावला. हळदी-कुंकू वाहिले. नमस्कार केला. स्वयंपाकघरात रात्रीच्या जेवणाच्या तयारीला लागल्या तरी संध्याकाळी येऊन गेलेल्या त्या व्यापाऱ्याने सांगितलेल्या गोष्टींचे विचार त्यांच्या मनातून जात नव्हते. तो पुन्हा पुन्हा विनवून सांगत होता,

'बेन, लक्ष्मी आर्ट गेला तर गेला. काय हरकत नाय. तुम्हीं काळजी करू नका. फाळकेशेट मनावर घेईल तर उद्याच्या उद्या दुसरा आर्ट प्रेस आम्ही त्यांच्या पुढं उभा करू. फक्त त्यांनी हो म्हणायचा अवकाश.'

'खरं आहे ते. पण 'इकडून' हो म्हणायचं झालं पाहिजे ना! पाहीन बापडी प्रयत्न करून.'

असे उत्तर त्यांनी दिले खरे, पण त्यांच्या पतिराजांचा स्वभाव त्यांना माहीत होता. त्यामुळेच त्यांचा होकार कितपत मिळेल याबद्दल त्यांना शंकाच होती. 'हल्लीं' असे का वागतात? तासन्‌तास कसला विचार करतात?' हे ही त्यांना कळत नव्हते. त्यांच्या मनात आले,

'एवढी मोठी संधी आता यांना आणखी कोणती मिळणार आहे, कोणास ठाऊक? अनेक व्यापारी सारखे बग्गी घेऊन यांना विचारायला येत आहेत. पैसे देऊन आर्ट प्रेस काढून द्यायला तयार आहेत, पण यांच आपलं एकच उत्तर, 'मी आता त्या धंद्यात पडणार नाहीं.' एवढा मान आणि पैसा मिळणार तरी कुठे? यांच्या मनात काहीतरी निराळंच असतं. काही विचारायला गेलं की म्हणतात, 'तुला त्यातलं काही कळायचं नाहीं. पुरुषानं जीवनात काही तरी महान ध्येय ठेवलं पाहिजे. जीवनात काहीं साधायचं असेल तर ध्यास आणि अभ्यास हवाच. लोकांच्या मिनतवारीनं जगण्यापेक्षा मी आता नवा व्यवसाय शोधणार आहे. मला त्यातलं काहीं कळत नसेल पण घर चालवायला पैसे लागतात हे तर

मला कळतं ना? घरात पैसे द्यायचे नाहीत, कुठला तरी ध्यास घ्यायचा आणि बसायचं तासन् तास विचार करीत. यानं का संसार होतो?'

विचार करता करताच त्यांचा स्वयंपाक झाला. त्या दादासाहेबांची वाट पहात बसल्या. रात्री बऱ्याच उशिराने दादासाहेब बाहेरून फिरून आले. आपल्याच तंद्रीत त्यांनी जेवायला सुरुवात केली. थोडा वेळ असाच गेला. मग सरस्वतीबाई त्यांना म्हणाल्या,

'ऐकलं का, आज एक व्यापारी येऊन गेले. नाव काय बाई म्हणाले ते?... काही लक्षात येत नाही..'

'हं.'

'आपण हो म्हणालात तर दुसरा छापखाना काढून द्यायला तयार आहेत ते.'

'आणखी काय म्हणतात..?'

'काही नाही; आपण फक्त 'हो' म्हणावं अशी त्यांची इच्छा आहे.'

'हं... मग... दादासाहेब आपल्याच विचारात बोलत होते. दुसरा व्यवसाय नाही. ते जर खर्च करीत असतील तर आपण 'हो' म्हणावं. घरचा खर्च तरी चांगला चालेल. आज किती ओढाताण होत आहे?'

'आणखी काय सल्ला आहे?'

'सल्ला काय असायचा आहे? आपण 'हो' म्हणावं?'

'आणि त्यांचं मिंधं व्हावं. असंच ना?'

'मिंधे होण्याचा प्रश्न तरी येतो का? उगाच डोक्यात काहीतरी घ्यायचं आणि बसायचं. ते जर सर्व पैसा खर्च करीत आहेत तर आपलं काय बिघडलं? या व्यवसायात आपण नाव मिळविलं आहे. आता नव्यानं तोच व्यवसाय केला तर पुन्हा कीर्ती मिळेल, पैसा मिळेल. संसार सुखाचा होईल.'

'हं... एकंदरीत तुम्हांला आमच्या मनाची कल्पना यायची नाही.

एक स्वतंत्र, उच्च ध्येय उराशी कवटाळून त्यासाठी आम्ही तळमळतो आहोत; पण तुम्हाला त्याचं काय? तुम्हाला पाहिजे चारचौघांसारखा संसार! सरस्वती, खरं सांगू, संसाराच्या साखळ्यांच्या या मंजुळ आवाजात आमच्या मनाला नाही वाटत आनंद!'

'असं काहीतरी बोललं म्हणजे झालं. संसारात मन रमत नव्हतं

तर लग्न केलंत कशाला? दोन वेळेला जेवायला लागतं ते पैशाशिवाय का मिळणार आहे? आज आपण पैसा देत नाही. किती दिवस चालायचं असं? तेव्हा...'

'सरस्वती, काय वाटेल ते झालं तरी आता मी छापखान्याचा धंदा परत करणार नाही. कोणत्याही प्रलोभनाला मला बळी पडायचं नाही. मी लवकरच एखादा नवीन व्यवसाय सुरू करीन.'

'मोठमोठ्या लोकांनी देऊ केलेल्या लक्ष्मीला लाथाडून आपण नवा धंदा तरी कोणता शोधणार आहात देव जाणे!'

'सरस्वतीबाईंनी हातातील भांड्यावर आपला राग काढला. त्याची जाणीव दादासाहेबांना झाली. ते काही बोलले नाहीत. जेवण आटोपून ते आपल्या खोलीत गेले. अस्वस्थपणे ते फेऱ्या मारीत होते. आपल्या पत्नीचे शब्द त्यांना आठवत होते. त्याचाच विचार ते करीत होते.

'येणाऱ्या लक्ष्मीला लाथाडून मी असा कोणता व्यवसाय सुरू करणार आहे की, ज्यात मला पैसा आणि कीर्ती मिळेल? मघाशी मला उत्तर देता आलं नाही, पण आता तरी माझ्यापाशी उत्तर कोठे आहे? माझं ध्येय काहीतरी स्वतंत्र व्यवसाय निर्माण करण्याचं आहे. पण कोणता व्यवसाय?'

'बऱ्याच उशिरापर्यंत ते आपल्या खोलीत फेऱ्या मारीत होते. तरीही उत्तर सापडत नव्हते. मन उद्विग्न बनले होते. नवा व्यवसाय!कीर्ती आणि पैसा देणारा!विचार चालू असतानाच कधीतरी पहाटेच्या सुमारास त्यांचा डोळा लागला.

सकाळी जेव्हा ते जागे झाले तेव्हाही नव्या व्यवसायाचे विचार त्यांच्या मनातून जात नव्हते. दिवस विचारातच जात होता. दुपारचे पाच वाजले आणि त्यांना आपल्या नेहमीच्या फिरण्याच्या कार्यक्रमाची आठवण झाली. त्यांचा प्रत्येक दिवस जरी बेचैन अवस्थेत जात होता, तरी त्यांनी फिरायला जाण्याचे व्रत सोडले नव्हते. प्रेसची भागीदारी संपल्यापासून तेवढाच एक विरंगुळा त्यांना होता. त्यातच विचारांची तीव्रता कमी करण्याचं सामर्थ्य होतं. उद्विग्न मनाला दिलासा देण्याची शक्ती होती. भोवतालची विविध दृश्ये ती किमया करू शकत नव्हती; म्हणूनच त्यांचा कार्यक्रम चालू होता.

आजही नेहमीप्रमाणे ते निघाले. खिशात चार आणे टाकले. चपला

घातल्या आणि घराच्या बाहेर पडले. बराच वेळ मनाच्या अस्वस्थ अवस्थेत ते भटकत होते. भोवतालची गर्दी, जाणारे येणारे युरोपियन व इतर लोक यांची त्यांना जाणीव नव्हती. मोटारचे वाजणारे भोंगे त्यांचे चित्त वेधू शकत नव्हते. ते आपल्याच विचारात चालले होते. अजून मार्ग दिसत नव्हता. रस्ता सापडत नव्हता. नव्याची नवलाई पाहाण्याची इच्छा असूनही, त्याची तळमळ असूनही ते ध्येय मात्र अजून अमूर्त होते. त्याला आकार दिला गेला नव्हता. शब्द तयार होते. कल्पना समोर होत्या. कष्ट जवळ होते, पण वेळ आली नव्हती. येत होती, पण त्याची जाणीव झाली नव्हती.



रात्र पडू लागली. मुंबईच्या दिव्यांनी रात्रीला उजळले. दादासाहेब अजूनही फिरत होते. फिरता फिरता गिरगावामधल्या अशा जागेवर आले की जेथे इंग्रजी वाद्यांचे स्वर स्वच्छ ऐकू येत होते. स्वरांच्या आवाजाच्या दिशेने आधी कान गेले आणि नंतर डोळे गेले.समोरच्या बाजूला एक तंबूवजा थिएटर होते. ते तसेच पुढे गेले. 'अमेरिका इंडिया' नावाचे थिएटर होते. येशू ख्रिस्ताच्या जीवनावरील चित्रपट होता. त्यांना

काय वाटलं कोण जाणे, त्यांनी खिशात हात घातला. चार आण्याचे तिकीट काढले आणि तंबूत जाऊन बसले.

अर्धा तास ते मूकपट पहात होते. तो संपल्यावर ते बाहेर आले. तो मूकपट पाहिल्यानंतर त्यांच्या मनःस्थितीत जमीन-अस्मानाचे अंतर पडले. जाताना चेहरा उद्विग्न होता. खिन्न होता. उदास होता. पुढे काय करायचे याची विवंचना चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. आता वरील कोणतेही भाव तेथे नव्हते. त्याची जागा आनंद व आत्मविश्वास यांनी घेतली होती.

येशूच्या त्या मूकपटाने त्यांच्या मनावर खोल ठसा उमटविला होता. एका महान् विभूतीचे जीवन प्रत्यक्षासारखे पडद्यावर दिसू शकते, याची त्यांना प्रथमच जाणीव झाली होती. लोकमानसावर त्याचा विलक्षण परिणाम होता, याचीही त्यांना प्रथमच कल्पना आली होती. विचार करिता करिताच त्यांना वाटले, 'मीही असाच मूकपट काढू शकलो तर?' दुसऱ्याच क्षणी त्यांच्या मनाने निश्चय केला हाच नवा व्यवसाय!

हरपलेले श्रेय सापडल्याच्या आनंदात त्यांची पावले घराच्या दिशेने वेगात पडत होती. तरीही जाताना त्यांच्या डोळ्यांसमोर नाचत होते मघाचे येशू ख्रिस्ताचे जीवन! चित्रपटात जसे एक चित्र सरकून त्याच्या जागी दुसरे चित्र येते, त्याप्रमाणे त्यांच्या मनाच्या पडद्यावरचे येशूचे चित्र सरकले आणि त्या जागी त्यांना राम दिसू लागला. हळूहळू सारे रामायण, महाभारत यातील प्रसंग त्यांच्या पुढून सरकू लागले. ते सारे प्रसंग त्यांना सांगू लागले,

'ऊठ! याच क्षणाची आम्ही वाट पाहात होतो. तो क्षण अगदी जवळ आला आहे. तुला नवा व्यवसाय पाहिजे ना? मग हा व्यवसाय नवीन आहे. कोणीही हाताळला नाही. भारतात पहिला मूक चित्रपट निर्माण करण्याचा मान तुला मिळेल. तेच ध्येय तू पुढे ठेव आणि लाग कार्याला."

काहीतरी नवीन सापडल्याच्या आनंदातच त्यांनी घरात पाऊल ठेवले. सावित्रीबाईंना ते सारे नवीन वाटले, पण विचारण्याचे धाडस मात्र झाले नाही. जेवतानासुद्धा त्यांचे लक्ष नव्हते. कसला तरी विचार करीत त्यांनी कसेबसे जेवण संपविले. आपल्या खोलीत ते आले. काही

पुस्तके त्यांनी चाळली. त्यांचे समाधान होईना. पुन्हा ते अस्वस्थ झाले. मूकपट कसा तयार करायचा ह्यावर त्यांची विचारचक्रे जोराने फिरू लागली. रात्रभर ते खोलीत फेऱ्या मारीत होते. मधूनच पुस्तकांची पाने फडफडत होती. ध्येय ठरले होते, पण ते सिद्धीस कसे न्यायचे याचा मार्ग ठरला नव्हता.

सकाळी दूध घेण्याकरता ते आत आले. ते पाहताच सरस्वतीबाई त्यांना म्हणाल्या,

'रात्री झोपला नव्हता वाटतं?'

'हं! कशावरून?'

'नाही, रात्रभर दिवा जळत होता म्हणून विचारलं.'

'नव्या व्यवसायाचा विचार करीत होतो.'

'मग, सापडला का? का नुसताच विचार नेहमीप्रमाणं!' सरस्वतीबाईंनी हसत विचारलं.

'आता नुसता विचार नाही. बरं, पण ते जाऊ दे. आज संध्याकाळी आपल्याला सिनेमाला जायचे आहे. संध्याकाळी तयार रहा.'

त्यांच्या या बोलण्याचे त्यांना आश्चर्य वाटले. तरी त्यांनी विचारले,

'पण नवा व्यवसाय कोणता ते तर सांगाल की नाही?'

'कळेल थोडेच दिवसांत..'

दादासाहेबांचा दिवस विचारातच गेला. सायंकाळचे पाच वाजले. ठरल्याप्रमाणे दोघे सिनेमाला निघाले. सिनेमाचे नाव होते 'अमेरिका इंडिया सिनेमाटोग्राफ!' थिएटरजवळ जाताच बँडचे आवाज ऐकू येऊ लागले. दादासाहेबांनी आठ-आठ आण्यांची पहिल्या वर्गाची तिकिटे काढली. गर्दी खूपच होती. दादासाहेब पत्नीसह त्या गर्दीत मिसळले आणि आपल्या जागेवर जाऊन बसले. थोड्या वेळाने चित्रपट सुरू झाला. दादासाहेबांनी त्याचे बारकाईने निरीक्षण चालवले होते.

सिनेमा संपला. दोघे बाहेर आले. सरस्वतीबाईंनी विचारले,

'एवढं बारकाईनं काय पाहात होता? आपण दोघांनी बरेच चित्रपट पाहिले असतील, पण आजच्या एवढं निरखून पाहाताना मी कधीच पाहिलं नाही आपल्याला.'

'चित्रांचे बारकावे बघत होतो. ती हलतात कशी? फोटोग्राफी कशी केली आहे ते बघत होतो.'

'खरंच, ही चित्र कशी हालतात हो? अगदी खरं दृश्य बघत आहोत असा भास होतो.'

दादासाहेबांनी जास्त चर्चा न करिता त्यांना प्रोजेक्शन रूमजवळ नेले आणि आतले यंत्र दाखवीत ते म्हणाले,

'ते पाहिलंस का यंत्र! त्याच्यामुळे ही चित्रे आपोआप हलताना दिसतात. बाकी, आत्ता नाही कळलं तरी चालेल. पुढे कळेल आपोआप.'

'म्हणजे.. ?'

'म्हणजे असं की, हाच नवा व्यवसाय आपण करणार आहोत.'

'खरंच?'

'आहे की नाही नवा धंदा! आता त्याकरिता कष्ट खूप करावे लागतील. पण, ते करायची जिद्द, तळमळ माझ्यात नक्कीच आहे. ते सारे कष्ट मी आनंदाने करायला तयार आहे.'

बोलता बोलता दोघे घरी आले.

दुसऱ्या दिवशी सकाळी दादासाहेब उठले. कालच्या टॉकीजवळ ते गेले. प्रोजेक्शन रूमचे जवळपास वेड्यासारखे भटकू लागले. एवढा मोठा माणूस ऑपरेटरच्या दृष्टीने निरुपयोगी फिल्मस् जमा करू लागला. भिकारी किंवा वेडे रस्त्यावरचे कागद जमा करतात ना तसे! त्यांना अशा स्थितीत पाहिल्यावर यांना वेड तर लागले नाही ना, असे कित्येकांना वाटले.

बरेच फिल्म्सचे तुकडे गोळा करून त्यांनी घरी आणले. एक मॅग्नीफाईंग ग्लास आणला. दुपारच्या जेवणानंतर त्यांनी त्या फिल्मचे बारकाईने निरीक्षण करायला सुरुवात केली. बराच वेळ हा कार्यक्रम झाल्यानंतर त्यांनी कोट, पगडी अडकविली आणि थिएटरचा रस्ता धरला.

सुमारे दोन महिने दादासाहेब रोज मूकपट पाहात होते. त्याचा त्यांना ध्यास लागला होता. आज मजेने चित्रपट पाहाणारे अनेक वीर भेटतील. त्या काळातही ते असतील. पण 'मला चित्रपट तयार करायचा आहे. त्यातून रामकृष्णाचे आदर्श जगाला सांगायचे आहेत.' हे ध्येय ठेवून त्याकरिता रोज चित्रपट पाहाणारा हा एकच!

दादासाहेबांना चित्रपट काढण्याचा नुसता ध्यासच लागला नव्हता तर त्याचबरोबर त्यांनी त्याचा अभ्यास सुरू केला होता. एके दिवशी त्यांनी टॉय सिनेमा विकत घेतला. फिल्मच्या माळाही विकत आणल्या.

आणि आणखी काही वेळातच दादासाहेबांना काहीच दिसेनासे झाले. ज्या खोलीत विजेच्या दिव्याने अंधाराला उजळले होते, त्याच खोलीत, त्याच दिव्याच्या प्रकाशात दादासाहेबांच्या डोळ्यांचा प्रकाश हरपला होता. डोळ्यापुढे अंधार होता. ध्येयाला अंधाराने आपल्या काळ्या हातांनी घट्ट पकडून ठेवले होते, त्या शांततेत त्यांचे हास्य दादासाहेबांना ऐकायला येत होते. त्याच्या शब्दांचा भास होत होता. 'बोल! आता तरी तुझे प्रयोग बंद होतील ना? असेल हिम्मत तर दाखव आता नवा व्यवसाय करून.'

काय करावे हे त्यांना सुचेना. घरातला कर्ता पुरुप आंधळा बनला. साऱ्या घराचाच प्रकाश अंतर्धान पावला. सगळीकडेच अंधाराचे साम्राज्य पसरले. घरात आणि दादासाहेबांच्या मनातही! आता ध्येय कसे गाठायचे, एवढी एकच तळमळ त्यांना लागली होती. ते देवाला एकच प्रार्थना करीत होते, 'देवा, एकदा मला मूकपट तयार करू दे. तो मला पाहू दे,. मग जरी मला आंधळं केलंस तरी चालेल, पण एवढी एकच संधी दे. देवा, एकच संधी दे.'

अनेक डॉक्टरांचे पुष्कळ उपाय झाले. दृष्टी येईना. शेवटी डॉक्टर प्रभाकरांना त्यांचे डोळे दाखविले. ते प्रख्यात नेत्रवैद्य होते. देवाला दादासाहेबांचे गाऱ्हाणे कळले. त्यानंही ते ऐकले. आणि काय चमत्कार देवाच्या दयेने म्हणा किंवा डॉक्टरांच्या उपायाने म्हणा त्यांना दृष्टी आली. गेलेली दृष्टी परत मिळाली. ध्येयसिद्धीकरिता परत प्रकाश सापडला. अंधाराकडून प्रकाशाकडे त्यांची वाटचाल सुरू झाली. समोरचे विश्व जेव्हा त्यांनी पाहिले तेव्हा त्यांना किती आनंद झाला. शब्दांनी कसा वर्णन करायचा तो? मुक्या माणसाला अमृताच्या गोडीचे वर्णन शब्दांनी करता येईल का? तसेच, खरोखर तसेच दादासाहेबांचे झाले.

या आनंदावरही बंधने होती. त्यांना वाचायची अथवा डोळ्यांवर ताण पडेल अशी कोणतीही कामे करायची परवानगी नव्हती. सरस्वतीबाईंना वाटले आता तरी हे चारचौघांसारखे वागतील. आपला नादिष्टपणा सोडून देतील. संसार व्यवस्थित करतील. पण त्यांची आशा फोल ठरली. ध्येयनिष्ठ लोक संकटांना घाबरून आपले ध्येय सोडत नसतात. उलट जो जो संकटे जास्त येतील, तो तो त्यांची शक्ती वाढत जाते. 'ध्येय' पूर्ण झाल्याशिवाय त्यांना गप्प बसवतच नाही. दादासाहेब ध्येयनिष्ठ

मेणबत्तीने लेन्सवर प्रकाश टाकून रात्रीच्या वेळी त्यांचे सिनेमाचे खेळ सुरू झाले. त्यातूनच ते भावी काळात तयार होणाऱ्या मूकपटाच्या कल्पना रंगवीत होते. ध्येयनिष्ठ माणसे कल्पनेतच कल्पना रंगवत न बसता त्या प्रत्यक्षात उतरविण्याचा खटाटोप करीत असतात.

मूकपट तयार करण्यासंबंधी आवश्यक ती माहिती मिळविण्याच्या प्रयत्नाला ते लागले. या विषयावर कोठे पुस्तके मिळतात का ते पाहावे, या करिता एके दिवशी त्यांनी फोर्ट विभागातील सारी दुकाने धुंडाळली, पण उपयोग झाला नाही. त्यांना एक दुकानात एवढेच कळले की, पुढील आठवड्यात एक पुस्तक येणार आहे. चातकासारखे ते वाट पहात राहिले. शेवटी पुस्तक हातात पडले. पुस्तकाचे नाव होते. 'ए.बी.सी. गाईड टू सिनेमाटोग्राफी!' मोठ्या आशेने त्यांनी पुस्तक उघडले आणि तेवढ्याच निराशेने त्यांनी ते खाली ठेवून दिले. अगदी सामान्य माहिती त्या पुस्तकात होती. फायदा एकच झाला आणि तो म्हणजे जाहिरातीच्या सहाय्याने कॅटलॉग आणि मशिनरी हे साहित्य इंग्लंडहून मागविता आले.

सामग्री येताच त्यांच्या कामाला वेगाने सुरुवात झाली. पुस्तके वाचणे, प्रयोग करणे यात त्यांचे तासन् तास जाऊ लागले. पुन्हा सायंकाळी तीन चार तास सिनेमा पाहाण्याचा कार्यक्रम असेच. हे सगळे करताना जेवणाची आबाळ होऊ लागली. रात्र रात्र झोप मिळेनाशी झाली. असे एकदोन दिवसच नाही तर सतत दीड दोन महिने चालले होते. ध्यास एकच होता सिनेमा तयार करणे! ध्येय ठरले होते. ते पूर्ण करण्याची तळमळ होती. जिद्द होती. म्हणूनच त्यांच्या जीवनाला एक प्रकारची शिस्त लागली होती. ध्येय डोळ्यांसमोर असले की जीवनात शिस्त आपोआपच येते.

या साऱ्या गोष्टींचा परिणाम शरीरावर होत होता. त्याची जाणीव त्यांना नव्हती एवढेच! डोळ्यांना भयंकर ताण पडत होता. त्यातून व्हायचे तेच झाले. दृष्टी अगदी मंद झाली. अंधुक दिसायला लागले. तरीही दादासाहेबांचे काम थांबले नाही. ते चालूच होते.

रात्रीची वेळ होती. आपल्या खोलीत ते फिल्मवर प्रयोग करीत बसले होते. विजेचा मोठा दिवा खोलीला उजळत होता. त्या तेजस्वी प्रकाशातसुद्धा त्यांना अगदी अंधुक दिसत होते. प्रयोग चालू होता. तास झाला, दोन तास संपले. प्रकाश आणखी कमी होऊ लागला

आणि आणखी काही वेळातच दादासाहेबांना काहीच दिसेनासे झाले. ज्या खोलीत विजेच्या दिव्याने अंधाराला उजळले होते, त्याच खोलीत, त्याच दिव्याच्या प्रकाशात दादासाहेबांच्या डोळ्यांचा प्रकाश हरपला होता. डोळ्यापुढे अंधार होता. ध्येयाला अंधाराने आपल्या काळ्या हातांनी घट्ट पकडून ठेवले होते, त्या शांततेत त्यांचे हास्य दादासाहेबांना ऐकायला येत होते. त्याच्या शब्दांचा भास होत होता. 'बोल! आता तरी तुझे प्रयोग बंद होतील ना? असेल हिम्मत तर दाखव आता नवा व्यवसाय करून.'

काय करावे हे त्यांना सुचेना. घरातला कर्ता पुरुष आंधळा बनला. साऱ्या घराचाच प्रकाश अंतर्धान पावला. सगळीकडेच अंधाराचे साम्राज्य पसरले. घरात आणि दादासाहेबांच्या मनातही! आता ध्येय कसे गाठायचे, एवढी एकच तळमळ त्यांना लागली होती. ते देवाला एकच प्रार्थना करीत होते, 'देवा, एकदा मला मूकपट तयार करू दे. तो मला पाहू दे,. मग जरी मला आंधळं केलंस तरी चालेल, पण एवढी एकच संधी दे. देवा, एकच संधी दे.'

अनेक डॉक्टरांचे पुष्कळ उपाय झाले. दृष्टी येईना. शेवटी डॉक्टर प्रभाकरांना त्यांचे डोळे दाखविले. ते प्रख्यात नेत्रवैद्य होते. देवाला दादासाहेबांचे गाऱ्हाणे कळले. त्यानंही ते ऐकले. आणि काय चमत्कार देवाच्या दयेने म्हणा किंवा डॉक्टरांच्या उपायाने म्हणा त्यांना दृष्टी आली. गेलेली दृष्टी परत मिळाली. ध्येयसिद्धीकरिता परत प्रकाश सापडला. अंधाराकडून प्रकाशाकडे त्यांची वाटचाल सुरू झाली. समोरचे विश्व जेव्हा त्यांनी पाहिले तेव्हा त्यांना किती आनंद झाला. शब्दांनी कसा वर्णन करायचा तो? मुक्या माणसाला अमृताच्या गोडीचे वर्णन शब्दांनी करता येईल का? तसेच, खरोखर तसेच दादासाहेबांचे झाले.

या आनंदावरही बंधने होती. त्यांना वाचायची अथवा डोळ्यांवर ताण पडेल अशी कोणतीही कामे करायची परवानगी नव्हती. सरस्वतीबाईंना वाटले आता तरी हे चारचौघांसारखे वागतील. आपला नादिष्टपणा सोडून देतील. संसार व्यवस्थित करतील. पण त्यांची आशा फोल ठरली. ध्येयनिष्ठ लोक संकटांना घाबरून आपले ध्येय सोडत नसतात. उलट जो जो संकटे जास्त येतील, तो तो त्यांची शक्ती वाढत जाते. 'ध्येय' पूर्ण झाल्याशिवाय त्यांना गप्प बसवतच नाही. दादासाहेब ध्येयनिष्ठ

होते. ध्येय पूर्ण करण्याची त्यांना तळमळ होती. आत्मविश्वास होता आणि जिद्दही!

अशा परिस्थितीतही ते दुसऱ्याकडून वाचून घेत होते. काही वेळा प्रयोग करीत होते. एके दिवशी प्रयोग करताना त्यांना वाटले नुसती पुस्तके वाचून आणि प्रयोग करून माहिती मिळत असली, तरी प्रत्यक्ष इंग्लंडला जाऊन काम पाहून येणे हे जास्त चांगले. लगेच त्यांचा निश्चय ठरला. त्यांच्या या संकल्पाला दहा हजार रुपयांची आवश्यकता होती.

ते सकाळीच उठले. लगेच त्यांनी यशवंतराव नाडकर्णी यांच्या दुकानाचा रस्ता धरला. नाडकर्णी यांचे फोटोग्राफीच्या साहित्याचे दुकान होते. दादासाहेब त्यांचे नेहमीचे गिऱ्हाईक असल्याने त्या दोघांची चांगलीच मैत्री जमली होती. ते दुकानात आले आणि त्यांनी आपली कल्पना यशवंतरावांना सांगितली. त्यांनाही ती आवडली. मग ते दोघांच्या विचाराने यशवंतरावांच्या सासऱ्यांच्या घरी आले. त्यांचे नाव होते आबासाहेब चिटणीस. मुंबईतील प्रसिद्ध सॉलिसिटर होते.

दोघेही दिवाणखान्यात आले. आबासाहेब आराम खुर्चीत पुस्तक वाचीत बसले होते. दोघांना पहाताच ते म्हणाले,

'या, बसा. काय काम काढलं आहे आज?'

यशवंतरावांनी ओळख करून दिली.

'हे दादासाहेब फाळके. अनेक क्षेत्रांत यांनी चांगली कामगिरी केली आहे. 'लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग वर्क्स' यांच्यामुळे भरभराटीला आले. शिवाय नाट्य-लेखन, अभिनय, फोटोग्राफी, ड्रॉइंग, पेंटिंग इत्यादी अनेक विषयांत ते प्रवीण आहेत. काही कलेत त्यांना सुवर्ण-पदकेही मिळाली आहेत.'

एवढी ओळख करून दिल्यानंतर दादासाहेबांनी त्यांना नमस्कार केला. उलट नमस्कार करीत आबासाहेब म्हणाले,

'अलभ्य लाभ! एका मोठ्या माणसाचं दर्शन घडलं. हं, मग काय यशवंतराव, आमच्याकडे काय काम काढलं आहे?'

'यांची एक नवी कल्पना आहे. ते ती पूर्ण करतील असा मला त्यांच्याबद्दलचा विश्वास आहे. म्हणून आपल्याकडे मार्गदर्शनाकरिता व सहाय्याकरिता घेऊन आलो.'

'असं होय; बोला काय आहे तुमची कल्पना?'

मग दादासाहेबांनीं भारतीय चित्रपट निर्माण करण्याची संपूर्ण कल्पना सांगितली. केलेले परिश्रम सांगितले व म्हणाले,

'मला वाटतं, प्रत्यक्ष इंग्लंडला जाऊन तेथे हे काम कसं करतात हे बघून यावं. जमलं तर शिकून यावं. म्हणजे इथं येऊन लगेच कामाला सुरुवात करता येईल.'

'वा, छान कल्पना आहे. अवश्य जावं. आजपर्यंत या बाबतीत कोणीच प्रयत्न केला नाही. आपण जात असाल तर मीं मदत करीन.'

'म्हणूनच आपणाकडे आलो होतो. आपल्यासारख्यांचे आर्शीर्वाद असतील तर हां हां म्हणता काम होईल. या कामाला दहा हजार रुपये तरी लागतील.'

त्यांचा आत्मविश्वास, जिद्द पाहून आबासाहेब अवाक् झाले; पण एवढे पैसे द्यायचे कसे याबद्दल मात्र ते साशंक होते. चेहऱ्यातला हा सूक्ष्म बदल न्याहाळत दादासाहेब परत त्यांना म्हणाले,

तारण देण्यासारखे मजजवळ काही नाही. फार तर या धाडसाबद्दल आपला भाग मी धंद्यात ठेवीन. आणि इंग्लंडलाच माझं काही बरं-वाईट झालं तर आपली रक्कम आपल्याला परत मिळावी त्याकरिता बारा हजार रुपयांच्या माझ्या विमा पॉलिसीज् मी आपल्या नावाने करून देण्यास तयार आहे.'

दादासाहेबांचे हे उत्तर ऐकून आबासाहेबांचे पूर्ण समाधान झाले. त्यांनी दहा हजार रुपयांची व्यवस्था केली. दादासाहेबांच्या ध्येयपूर्तीला हा शुभ शकून होता.

दादासाहेब लगेच इंग्लंडला गेले. 'बायोस्कोप' या साप्ताहिकाच्या संपादकांची आणि त्यांची ओळख झाली. त्याचा त्यांनी चांगला उपयोग करून घेतला. संपादकाचं नाव होतं मि. केबर्न!

अत्यंत घाईत त्यांनी अनेक दुकानांतून विविध प्रकारची पुस्तके घेतली. इतर सामग्रीची माहिती घेतली. मि. केबर्न यांच्या ओळखीमुळे त्यांना एका स्टुडिओतील कामकाज प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहाता आले. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. आपल्याला हे सहज जमेल याची त्यांना मनोमनी खात्री पटली. केवळ दहा-बारा दिवसांत त्यांनी या साऱ्या गोष्टी अत्यंत तळमळीने आणि धडाडीने केल्या. मग त्यांनी विल्यम्सन् फिल्म-कॅमेरा, एक प्रिंटींग्र मशीन, फिल्मला भोकं पाडणारे एक परफोरेटिंग

मशीन घेतले. कोडॅक कंपनीला कच्च्या फिल्मची ऑर्डर दिली. आणि दहा-बारा दिवसांच्या अल्पावधीत एवढे प्रचंड काम करून त्यांनी इंग्लंड सोडले. ते भारतात आले. पाठीमागून थोडे दिवसांतच सर्व सामग्री आली. आता प्रश्न होता, कथानक कोणते निवडायचे? सारी कामे त्यांनाच करायची होती. त्यांच्या डोळ्यासमोर एक प्रसंग आला. राजा हरिश्चंद्राचा! राजा हरिश्चंद्र! सत्त्वशील राजा! स्वप्नात दिलेले दान पूर्ण करण्याकरिता वाटेल त्या हालअपेष्टांना तोंड देणारा राजा! ध्येयवादी राजा! आपल्या ध्येयपूर्तीची तळमळ असणारा राजा! दादासाहेबांना कथानक सापडले. आदर्श कथानक सापडले. थोड्याच दिवसांत पटकथा तयार झाली. कॅमेरामन् तयार होताच. रसायनशाळा? त्यांच्या घरात तीही तयार होती. स्वतः रसायनतज्ज्ञ होतेच. वेळेला मालकापासून नोकरापर्यंतच्या सगळ्या भूमिका त्यांनाच पार पाडावयाच्या होत्या.

आता फक्त एकच अडचण राहिली होती. नट! ते कोठून आणायचे? सिनेमात काम करायला नट मिळविणे हे त्या काळी अत्यंत कठीण होते. शेवटी दादासाहेबांनी स्वतःच हरिश्चंद्राची भूमिका करायचा निश्चय केला. रोहिदास होताच त्यांचा मुलगा. आता राहिली तारामती! तारामती काही केल्या मिळेना. स्त्री भूमिकेकरिता स्त्री मिळणे तर शक्यच नव्हते, पण कोणी पुरुषही ती भूमिका करायला तयार होईना. आपल्या मिशांना रजा द्यायला कोणीच राजी नव्हता. शेवटी अनेक ठिकाणी हिंडल्यानंतर साळुंके नावाचे गृहस्थ तारामतीची भूमिका करायला तयार झाले. मोठ्या मिनतवारीने! आपण मोठे उपकार करीत आहोत अशा थाटात! अशाच यातायातीने दुय्यम पात्रे मिळाली. पात्रे मिळवायलाच एवढा ताप झाला की सामान्य माणूस असता तर तो म्हणाला असता, 'नको ती पात्रे आणि नको तो मूकपट. नसता खटाटोप सांगितला आहे कोणी? बरे, पैसा पै मिळण्याची सुरुवातीला शक्यता नाही.' पण दादासाहेबांनी आपले ध्येय सोडले नाही. चिकाटीने ते काम करीत होते.

नटसंच सजल्यानंतर त्यांना साऱ्या सूचना देण्यात आल्या. मग शूटिंगला सुरुवात झाली. त्यावेळी स्टुडिओ नव्हते. सेट तयार करणे आजच्या इतके सोपे नव्हते. जंगलाचा देखावा स्टुडिओत तयार करता येत नव्हता. दादासाहेबांना शूटिंगकरिता उन्हातान्हात फिरावे लागत असे. ही सारी यातायात करताना किती कष्ट पडत असतील, याची

कल्पनाच केलेली बरी. डोळ्यांसमोरचे ध्येय त्यांना सतत स्फूर्ती देत होते. म्हणूनच एवढे श्रम करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण झाली होती.

दिवसभर उन्हातान्हात शूटिंग झाल्यानंतर रात्रीदेखील त्यांना विश्रांती मिळत नसे. आपल्या जवळच्या नटांना थोडी थोडी माहिती देऊन त्यांच्याच सहाय्याने फिल्म जोडणे, तोडणे या क्रिया कराव्या लागत. बऱ्याच रात्रीपर्यंत त्यांचा हा कार्यक्रम चालू असे. पण कोणीतरी हे करावेच लागते. भारतात त्या वेळेपर्यंत या व्यवसायाकरिता एवढे श्रम कोणी केलेच नव्हते. कोणी कष्ट घेतलेच नव्हते. कोणीही हा व्यवसाय केला नव्हता. म्हणूनच नव्या नवलाईने, नव्या गोष्टींच्या हव्यासाच्या ध्यासाने या साऱ्या गोष्टी चालल्या होत्या.

होता होता शेवटी मूकपट तयार झाला. 'राजा हरिश्चंद्र!' महाराष्ट्राचा पहिला मूकपट! भारताचाही पहिला मूकपट! दादासाहेबांच्या आशेच्या वेलीला आलेले पहिले टपोरे फूल! ध्येयाच्या यज्ञाची गोड सांगता! केलेल्या कष्टांचे आणि भोगलेल्या यातनांचे मधुर फळ!

चित्रपट तयार झाला, पण तो दाखविणार कोठे? सर्वांत मोठी समस्या तीच होती. अमेरिकन चित्रपटांच्या सिरीजच्या सिरीज दाखविल्या जात असताना आणि त्यात तुफान पैसा मिळत असताना ज्याचा बोलबाला नाही, प्रसिद्ध नटसंच नाही, जाहिरात नाही असा चित्रपट दाखविणार कोण? तोटा सहन करणार कोण? तरी पण, इच्छा असली की मार्ग दिसतो. अनेक प्रयत्न केल्यानंतर नानाभाई चित्रे या गृहस्थांनी सँढर्स्ट रोडवरील कॉरोनेशन चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्शित करण्याची तयारी दाखविली. अशा तऱ्हेने शेवटी दादासाहेबांनी चित्रपटाच्या निर्मितीपासून ते प्रकाशनापर्यंतची सारी व्यवस्था शिताफीने हाताळली.

तो दिवस १७ मे १९१३ चा होता. सायंकाळ झाली होती. 'कॉरोनेशन' चित्रपट गृहाचे आवार माणसांनी फुलले होते. आवार स्वच्छ होते. एक मंगलमय घटिका भरत आली होती. सारे उत्सुक होते. सर भालचंद्र भाटवडेकर आले. त्यांच्याबरोबर दादासाहेबही होते. सरस्वतीबाईही होत्या. थोड्या वेळाने मूकपट दाखविला गेला. महाराष्ट्राचा तसेच भारताचा पहिला मूकपट चंदेरी पडद्यावर साकार झाला. अमूर्त स्वप्न मूर्त झाले.

नंतर तेथेच समारंभ झाला. सर भालचंद्र भाटवडेकरांनी दादासाहेबांची मुक्त कंठाने स्तुती केली. श्री. आबासाहेब चिटणीस, श्री. नाडकर्णी यांनीही त्यांची स्तुती केली. या सर्व गोष्टींनी ते भारावून गेले.

सरस्वतीबाई आनंदाने आपल्या पतीकडे पाहात होत्या. त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. स्तुतीचे शब्द त्या जीवाचे कान करून ऐकत होत्या आणि ते ऐकत असताना त्यांना स्थळकाळाचेही भान राहिले नव्हते.

● ● ● ●

म. वं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. ३००५ दिनांक १०/८/१४
विषय ज्ञा.वा. क्र. ......
BVBK-0403005

नंतर तेथेच समारंभ झाला. सर भालचंद्र भाटवडेकरांनी दादासाहेबांची मुक्त कंठाने स्तुती केली. श्री. आबासाहेब चिटणीस, श्री. नाडकर्णी यांनीही त्यांची स्तुती केली. या सर्व गोष्टींनी ते भारावून गेले.

सरस्वतीबाई आनंदाने आपल्या पतीकडे पाहात होत्या. त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. स्तुतीचे शब्द त्या जीवाचे कान करून ऐकत होत्या आणि ते ऐकत असताना त्यांना स्थळकाळाचेही भान राहिले नव्हते.

●●●●

म. ग्रं. सं. ठाणे, बालवाङ्मय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. 3005 दिनांक १०/१/८४
विषय बा. वा. क्र. ........

BVBK-0403005